20 TO 26 JUNE 2022 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 18/06/2022 10:17 PM Page 1

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० अंक : २६ सोमवार दि. २० जून २०२२ ते रविवार दि. २६ जून २०२२ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## एक कोटीच्या विम्यासाठी पत्नीचा तोल गेला पतीला ठार मारून अपघाताचा बनाव केला

बीड/क्राईम रिपोर्टर

आजकाल माणसासाठी पैसा हेच सर्वस्व आहे. पैशासाठी माणूस कोणत्याही थराला जाऊ शकतो. पैशासाठी माणूस नात्यागोत्याचीही किमत करीत नाही. बीड मधील अशाच एका घटनेत पतीच्या एक कोटीच्या विम्याच्या रकमेसाठी पत्नीने त्याच्या हत्येचा कट रचला आणि आपल्याच एका ओळखीच्या माणसाला १० लाखांची सुपारी दिली आणि त्यांनी आपल्या साथीदारांच्या मदतीने तिच्या पतीची हत्या करून तो स्कूटरवरून पडून मेला असा ...पान २ वर

## कशी रोखणार गुन्हेगारी पोलीस बनला गुन्हेगार प्रेयसी त्याच्या मागे लागताच निर्दयीपणे केले ठार

उल्हासनगर/क्राईम रिपोर्टर



गुन्हेगारीला जर आळा घालायचा असेल तर अगोदर ज्यांच्यावर कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी आहे त्यांचे वर्तन चांगले असायला हवे. आपल्यावरील जबाबदारीची त्यांना जाणीव असायला हवी आणि मुख्य म्हणजे गुन्हेगारांना त्यांची दहशत असायला हवी. पण दुर्दैवाने आज गुन्हेगारांना कायद्याची किंवा पोलिसांची अजिबात भीती राहिलेली नाही. कारण काही ठिकाणी पोलिसच गुन्हेगारांसारखे वागू लागले आहेत आणि गुन्ह्यांच्या काही घटनांमध्ये पोलिसांना अटकही झालेली आहे. कधीकाळी एन्काऊंटर किंग अशी ओळख असलेले पोलीस अधिकारी आज गुन्हेगारांप्रमाणे तुरुंगात जात आहे. समाजातील प्रेमप्रकरणे आणि त्यातून होणाऱ्या हत्या किंवा आत्महत्या या काही नव्या नाहीत. पण अशा घटना घटनांना आळा घालण्यासाठी समाजाशी संवाद ठेवण्याची जबाबदारी ज्या पोलिसांवर आहे. त्याच पोलीसदलात आता अनैतिक संबंधांचे प्रकार वाढलेले आहेत आणि त्यातून काही महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी आत्महत्या सुद्धा केलेल्या आहेत. पोलीस दलातील अनैतिक संबंधातून एका महिला पोलीस अधिकारीची एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने अत्यंत निर्घुणपणे हत्या केल्याची घटनाही या महाराष्ट्रातील पोलीस दलात घडलेली आहे. गुन्हेगारीला रोखण्यासाठी असलेल्या पोलीस दलातील काही पोलिसांच्या खाकीवर्दिवरच जेंव्हा गुन्हेगारीचे डाग लागतात तेंव्हा समाजाच्या पोलिसांवरील विश्वासालाच कुठेतरी तडा जातो. उल्हासनगर मधील अशाच एका घटनेत एका पोलिसाचे औरंगाबाद मधील नर्स बरोबर अनैतिक संबंध होते आणि तिने त्याच्यासोबत कायम राहता यावे यासाठी त्याच्यामागे तगडा लावला होता. पण तो विवाहित असल्याने तिला आपल्यासोबत ठेऊ शकत नव्हता. पण ती त्याचा पिच्छा सोडायला तयार नव्हती. अखेर कायद्याचा रक्षक असलेल्या या खाकीवर्दिवाल्याने गुन्हेगाराप्रमाणे कायदा हातात घेतला आणि आपल्या प्रेयसीची हत्या केली. एक पोलीस खुनी बनला. त्यामुळे आता तो एखाद्या गुन्हेगारा प्रमाणे पोलीस कोठडीत आहे.




हिललाईन पोलीस स्टेशनमध्ये सचिन खाजजेकर हा पोलीस नाईक पदावर कार्यरत आहे.तो सुभाष टेकडी उल्हास नगर येथे पत्नी मुलासह राहयला आहे.तो औरंगाबाद येथे कार्यरत असताना त्याचे आशा मोरे या महिलेशी सुत जमले होते.ती औरंगाबाद येथील रुग्णालयात नर्स म्हणून काम करीत होते.खरे तर आशा ही सचिनपेक्षा वयाने किती तरी मोठी होती.पण तिची भरगच्च आणि मादक जवानी बघून सचिन लाळ टपकित होता.ती ही तो पोलीस खात्यात आहे म्हणून त्याला चिकटली होती.तिला ही नवरा मुले होती.तिचा नवरा तिच्यापेक्षा वयाने मोठा असल्याने बेडवरच्या खेळात तो कमी पडत होता.अशातच सचिनशी तिची ओळख झाल्याने ती त्याला आपल्या अंगावर ओढून घेत होती.शारीरिक वासनेपोटी ते दोघे एकत्र आल्याने दोघेही एकमेकांची गरज पुर्ण करीत होते. आशा त्याला बेडवरच्या खेळात चांगलीच खेळवत होती.ती तशी चालू असल्याने प्रत्येकवेळी ती काही ना काही कारण सांगून त्याचेकडून पैसे काढत असायची. मादक आणि सेक्सी आशाची जवानी ओरबाडताना तो कुठे ही कमी पडत नव्हता. तिला ही तेच पाहिजे असल्याने ती त्याला पाहिजे तसे सुख ओरबाडू देत होती. वयाच्या ५0शीतही तिची जवानी २५ शीतील तरूणीला लाजवील अशी मादक होती. त्यातच सचिन सारखा तगडा ...पान २ वर

## अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाला बिंग फुटू नये म्हणून आवाज बंद केला






जव्हार/पारस सहाणे

पालघर सारख्या आदिवासी जिल्ह्यात गुन्हेगारीच्या घटना वाढत असून या वाढत्या गुन्हेगारीमुळे आदिवासी पट्ट्यातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. जव्हार तालुक्यातील वडपाडा या गावात एका १६ वर्षाच्या मुलीची हत्या करण्यात आली असून तिच्यावर बलात्कार झाल्याचा संशय आहे. या प्रकरणी दोन संशयिताना अटक करण्यात आली असून त्यांची कसून चौकशी सुरु आहे. या घटनेमुळे परिसरातील महिलांमध्ये भीतीचे वातावरण असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

राज्यात दहावीच्या परीक्षेत विद्यार्थीनींनी मिळवलेले यश साजरं होत असताना दुसरीकडे जव्हारमधून मन सुन्न करणारी घटना समोर आली होती. जव्हार तालुक्यातील वडपाडा येथील १६ वर्षीय आदिवासी अल्पवयीन मुलीचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना बुधवारी उघडकीस आली आहे. दहावीची परीक्षा दिलेल्या अल्पवयीन मुलीचा मृतदेह वडपाडा गावापासून काही अंतरावर आढळून आला होता. मंगळवारपासून ही अल्पवयीन मुलगी बेपत्ता होती. बराच वेळ झाला तरी ती घरी न परतल्याने कुटुंबीय घाबरले होते. त्यांनी परिसरात तिचा शोध घेतला तरी ती सापडली नाही. अखेर तिच्या कुटुंबियांनी बुधवारी ही अल्पवयीन मुलगी हरवली असल्याची तक्रार जव्हार पोलीस ठाण्यात दाखल केली होती. त्यानंतर बुधवारी गावकऱ्यांना तिचा मृतदेह आढळून आला. त्यानंतर एकच खळबळ उडाली. मृत अल्पवयीन मुलीच्या अंगावर व डोक्यावर मार लागल्याचे प्रथमदर्शी दिसून आले आहे. या मुलीवर बलात्कार झाल्याच्या संशय व्यक्त केला आहे. तिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. पोलिसांना शवविच्छेदन अहवालाची प्रतिक्षा आहे. मन सुन्न करणारी घटना घडल्यामुळे पालघर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक प्रकाश गायकवाड यांनी घटनास्थळाची पाहणी केली होती. जव्हार उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली जव्हार पोलीस निरीक्षक आप्पासाहेब लेंगरे तपास करीत होते. पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला होता तसेच स्थानिक गुन्हे शाखा ही तपास करीत होती. पोलिसांनी अत्यंत ...पान २ वर

## व्यसनाने संपवले बाप-लेकातले प्रेम दारुड्या बापाचा मुलानेच केला गेम



पुणे/परमेश्वर गडदे

दारुडा माणूस हा जितका बाहेरच्या लोकांसाठी तापदायक असतो, तितकाच तो कुटुंबातील लोकांसाठीही तापदायक असतो. कारण असा माणूस दारू पिऊन आला कि घरात धिंगाणा करतो आणि कुटुंबाच जिणे हराम करतो. त्यामुळे अशा माणसाच्या त्रासाला कंटाळलेले कुटुंबातील लोक मग नात्यागोत्याचा विचार न करता टोकाचा निर्णय घेतात. पुण्याच्या कोंडवा भागात राहणारा पवन शर्मा हा सुद्धा असाच दारुडा होता आणि पिऊन आल्यावर मुलांना मारहाण करायचा. त्यामुळे एकेदिवशी मुलानेच आपल्या आत्येभावाच्या मदतीने बापाला ठार मारले. या प्रकरणी पळून जाणाऱ्या दोन्ही आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.

पोटच्या मुलानेच वडिलांची हत्या केल्याची धक्कादायक घटना पुण्यातील कोंढवा परिसरात समोर आली आहे. मद्यप्राशन करून त्रास देत असल्याच्या कारणातून मुलाने मावसभावाच्या ...पान २ वर

## कर्जाची परतफेड करूनही त्याने छळवाद केला दहा हजारासाठी लबाड सागर जीवानिशी गेला

जळगाव/क्राईम रिपोर्टर



मयत सागर

काही लोक दादागिरीच्या जोरावर लोकांचा छळवाद करीत असतात. जळगाव मधील सागर पती हा सुद्धा त्यापैकीच एक होता. गरजूंना व्याजाने पैसे द्यायचे आणि पैसे परत केले तरी पैसे दिलेच नाही असे सांगून जबरदस्तीने समोरच्याकडून पैसे उकळायचे असा त्याचा धंदा होता. आरिफला त्याने १0 हजार दिले होते. मात्र आरीफने त्याच्याकडून घेतलेले पैसे व्याजासकट परत करूनही तो पुन्हा पैसे मागत होता. अखेर वैतागलेल्या आरीफने सागरच्या डोक्यात लोखंडी रॉडचे प्रहार करून त्याला ठार मारले आणि आपल्या मागची ब्याद कायमची संपवली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.





संगतीत आल्याशिवाय आणि पंगतीत बसल्याशिवाय जवळीक निर्माण होत नसते. जवळीक निर्माण होण्यासाठी संगत आणि पंगत या दोन्ही घटकांचा मेळ बसावा लागतो. एका विशीष्ट धेय्याच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या समविचारी लोकांना एकमेकांच्या संगतीत येण्यास वेळ लागत नाही. एकदा संगतीत आले म्हणजे त्यांची पंगत बसल्याशिवाय रहात नाही. पंगत ही एखाद्या शेतात भारतीय बैठक स्वरुपात देखील असते अथवा एखाद्या बिअर बारमधील टेबलवर देखील असते. बिअर बारच्या टेबलवरील बैठक देखील एक पंगतच म्हटली जाते. कारण त्यापुर्वी सर्व संबंधितांची संगत घडलली असते. संगत ही पंगतीची पहिली पायरी ...पान २ वर

## प्रेमवेड्या मुलीचा संताप अनावर झाला प्रियकराच्या मदतीने आईचा खून केला

औरंगाबाद/क्राईम रिपोर्टर



मयत सुशिला

प्रेम आंधळे असते आणि त्याही पेक्षा आंधळी असते. वासना अल्पवयीन मुलीला वासनेची चटक लागली कि मग तिच्या वासनेच्या खेळात जो कुणी आडवा येईल त्याची ती गय करीत नाही. अशावेळी रक्ताच्या नात्यालाही ती जुमानत नाही. औरंगाबादमध्ये एका १६ वर्षाच्या मुलीने प्रेमाला विरोध करणाऱ्या आपल्या जन्मदात्या विधवा आईला प्रियकर आणि एका मैत्रिणीच्या मदतीने ठार मारले. प्रेमासाठी आईची हत्या करताना तिच्या उपकाराची तिने अजिबात जाण ठेवली नाही. या प्रकरणी पोलिसांनी या कृतघ्न मुलीला तिच्या प्रियकरासह अटक केली आहे.

पतीचे निधन झाल्यानंतर दोघा मुलींसह एका मुलाची जबाबदारी सुशिला संजय पवार यांच्यावर येऊन पडली होती. पती निधनाचे दुख: थोड्याफार प्रमाणात कमी झाल्यानंतर सुशिला पवार यांनी आपल्या मुलांच्या पालणपोषणासह सर्व प्रकारची जबाबदारी कुशलतेने सांभाळण्यास सुरुवात केली. गेल्या काही वर्षापासून सुशिला पवार या औरंगाबाद शहरातील अंबिकानगर, मुकुंदवाडी भागात आपल्या दोघी मुली व एका मुलासह राहण्यास आल्या होत्या. शिवाजीनगर नजीक भाजीपाला विकून आलेल्या मोबदल्यात त्यांनी ...पान ६ वर

## वॉचमॅनची हत्या करून भंगार चोरांनी पोबारा केला रिक्षावरच्या जाहिरातीमुळे खुनाचा पर्दाफाश झाला



डोंबिवली/एस.कुमार

गुन्हेगार कितीही चलाख असो गुन्हा करताना तो काहीना काही पुरावा मागे सोडतोच आणि हाच पुरावा पोलिसांच्या तपासाचा धागा बनतो आणि या पुराव्याच्या आधारे पोलीस आरोपीच्या मुसक्या आवळतात. डोंबिवलीत भांगार चोरांनी तिथल्या सुरक्षा रक्षकाची हत्या केली होती. मात्र त्यांनी हत्येत वापरलेल्या रिक्षावर एबीपी माझा परिवाराकडून एबीपी वेडिंग बॅनर लावला होता, पण नंतर त्यांनी तो काढला आणि त्यावरूनच पोलिसांनी या भंगार चोरांच्या मुसक्या आवळल्या.

१५ जून २०२२ चा दिवस होता. सकाळची वेळ होती. त्यादिवशी मानपाडा पोलीस ठाण्यातील कर्मचारी आपापल्या कामात व्यस्त असताना, एका व्यक्तींनं पोलीस ठाण्यात प्रवेश केला. ठाणे अमलदाराने त्या व्यक्तीला पोलीस ठाण्यात येण्याचे कारण विचारले? तसेच त्याचे नाव व राहण्याचा पत्ता विचारला असता, तेव्हा त्या व्यक्तीने आपले नाव जसवंतसिंग रणबहादुर ठाकुर रा. खबाळपाडा, डोंबिवली (पुर्व) असे सांगितले. डोंबिवली येथील विजय पेपर प्रॉडक्ट मिल या कंपनीत ...पान ६ वर

## भेळवाल्याच्या पत्नीचा सोनाराला लागला लळा सोन्याची अंगठी मागताच त्याने आवळला गळा

सांगली (विटा)/क्राईम रिपोर्टर



काही बायकांना दागिन्याची भारी हौस असते. दागिने घालून नटायची मुरडायची सवय असलेल्या बाईला जर या गोष्टी तिच्या पतीकडून मिळाल्या नाहीत, तर मग ती दुसरा गाठते विटा येथील ताई निकम ही सुद्धा तशीच होती. त्यामुळे तिने चक्क एका सोनाराला जाळ्यात ओढले. तो तिला पैसे देऊन तिची जवानी लुटत होता, पण तिचे लक्ष मात्र त्याच्या दुकानातील दागिन्यांवर होते. त्याची सुरुवात तिने वाढदिवसाला अंगठी मागून केली, पण त्याने नकार देताच तिने त्याला ब्लॅकमेल करायला सुरुवात केली. अखेर वैतागलेल्या सोनाराने स्वतःच्या हाताने तिचा गळा दाबून तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

राहुल पवार याचे विटा शहरात रेणुका ज्वेलर्स नावाचे सराफाचे दुकान आहे.तो मुळचा खानापूर तालुक्यातील वासुंबे येथील असून तो दररोज विटा येथे दुकानाच्या कामानिमित्य ये जा करीत असतो.सराफाचे दुकान असल्याने त्याची आर्थिक परिस्थीती ही सधन असल्याने त्याचा पाय वेगळीकडे वळायला वेळ लागला नाही. त्याच्या सराफाच्या दुकनात नेहमी ताई निकम नावाची महिला येत जात होती. त्यातूनच त्या दोघांची ओळख वाढली ...पान ६ वर

## पती पत्नीतील वाद विकोपाला गेला गोड बोलून त्याने पत्नीचा गेम केला



मयत प्रियांका

इस्लामपूर/क्राईम रिपोर्टर

पत्नी सुंदर असली कि पती नेहमीच तिच्या चारित्र्यावर संशय घेत असतो आणि त्यातून सतत घरात भांडणे होत असतात आणि मग याच भांडणातून दोघांच्याही मनात एकमेकांना संपवण्याचे विचार येतात. अशावेळी कधी पत्नी आपल्या प्रियकराच्या मदतीने पतीला संपवते, तर कधी पती गोड बोलून पत्नीला संपवतो. तुजारपूर येथील प्रियांका आणि सुनील याचे रोज भांडण व्हायचे म्हणून प्रियांका घरातून बाहेर पडली आणि हप्ताभर बाहेर राहिली. अखेर पतीने गोड बोलून तिला घरी आणण्याचा बनाव केला आणि रस्त्यातच तिला ठार मारल. या घटनेनंतर पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली आहे.





तुजारपूर येथील सुनिल गुरव आणि त्याची पत्नी प्रियांका याच्याबाबत ही नेमके असेच घडले होते. त्याची पत्नी प्रियांका ही दिसायला देखणी सुंदर होती. तिला आपल्या सौंदर्याचा अभिमान होता. ती कायम नटरंगीपणाने वागत असल्याने सुनिलच्या मनात तिच्या चारित्र्याचा संशय येवू लागला होता. जेमतेम त्याच्या लग्नला पाच ते सहा वर्ष झाली होती. या दरम्यान त्यांच्या सुखी संसाराला आग लागली होती. तिच्या वागण्यात आणि राहणीमानात त्याला फरक जाणवू लागल्याने याचा जाब तो तिला विचारीत असताना उलट तिच ...पान २ वर

20 TO 26 JUNE 2022 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 18/06/2022 10:18 PM Page 1



पान १ वरून....

## कशी रोखणार गुन्हेगारी पोलीस...

गडी तिला मिळाल्याने तिची जवानी आणखीनच खुलत होती. ती त्याचेवर आपली जवानी लुटून त्याचेकडून पैसे उकळीत होती. तो ही तिला पाहिजे ती वस्तू पैसा देत होता.गेल्या तीन चार वर्षापासून त्या दोघांचे संबध चालू होते. त्या खेळात ती त्याला चांगलेच खेळवत होती. सचिन ही तिच्या जवानीवर फिदा झाला होता. बेडवरच्या खेळात तो कुठे कमी पडत नाही हे तिने ओळखले होते. म्हणून तरी ती त्याला सारखे बोलावून घेऊन आपली खाज भागवून घेत होती. शारीरिक वासनेची आग पेटली की ती भागविण्यासाठी काही महिला कोणत्या ही थराला जातात तसेच आशाचे ही झाले होते. तिची ती गरज तिच्या नवऱ्याकडून पुर्ण होत नसल्याने तिने सचिनचा हात धरला होता. यामागे तिचा वेगळाचा हेतू होता. ती त्याचेकडून त्या बद्दल्यात पैसे काढण्याचा सारखा प्रयत्न करीत होती.ती त्याच्या मागे सारखा पैशाचा तगादा लावीत होती. तिच्या सारखे पैसे मागण्यावरून सचिन ही वैतागलेला होता.अलिकडे तर त्याला तिचा कंटाळा आलेला होता. त्याचे मन तिच्यापासून भरले होते. ती त्याला त्या कामासाठी आता नकोशी वाटत होती.तो तिला सारखी बुढ्ढी घोडी म्हणून चिडवित होता. ती ही त्याला मी जर बुढ्ढी असली तरी तुझ्या बायकोपेक्षा जास्त भारी तुला ते सुख देते म्हणून तू माझ्याजवळ पडून राहतोस असे ती ही त्याला म्हणत होती.त्या दोघांचा इश्काचा खेळ रंगात येत होता. अशातच सचिनची बदली औरंगाबादहून ठाणे उल्हासनगर येथे पोलीस नाईक या पदावर झाली.येथे तो आपल्यां पत्नी मुलासह राहयला आल्यावर देखील आशा त्याचा पिच्छा सोडत नव्हती. ती त्याला रोज मोबाईलवर फोन करून मला भेटायला ये. मला पैसे दे असे सांगत होती. हल्ली तो कामात व्यस्त असल्याने त्याला तिला भेटायला औरंगाबादला जाणे शक्य होत नव्हते. तरी ही तो खास तिच्यासाठी म्हणून पंधरा दिवसातून एकदा औरंगाबादला जात होता. तिला भेटून तिच्याबरोबर मजा मारून तिला पैसे देऊन परत येत होता.एवढ्यावर तिचे भागत नसल्याने हल्ली ती त्याला मला ही तुझ्याबरोबर ठाण्याला ने. मी तुझ्याबरोबर राहते असे सांगत होती. उल्हासनगर येथे तो पत्नी मुलासह राहयला असल्याने इकडे आशाला आणणे त्याला धोक्याचे वाटत होते. या एका कारणातून त्या दोघात भांडणे होऊ लागली होती. भांडणात ती त्याला तू पोलीस असलास म्हणून काय झाले. मला ही काही कायदा माहित आहे.मला तू ठेवून घेणार नसशील तर मी तुझी तक्रार तुझ्या वरिष्ठाकडे करेन. तुझी बदनामी करेन असे बोलून त्याला धमकी देत होती.आशाही दिसते तशी नाही याची प्रचिती सचिन याला आलेली होती. ती त्याला दोघामधील झालेल्या शारीरिक संबधाचा धागा पकडून त्याला ब्लॅकमेल करू लागली होती. काय करावे म्हणजे हिच्या कचठ्यातून सुटू याचा तो विचार करीत असताना त्याने या गोष्टीची कल्पना आपला मेहुणा कल्पेश उर्फ केशस खैरनार याला दिली. त्या दोघांनी यावर विचार करून आशाचा कायमचा काटा काढला तर यातून निसटू शकतो असा सारासार विचार केला.त्यातच सचिन हा पोलीस खात्यात असल्याने त्याला पोलीस खात्यातील सगळे बारकावे माहित होते. तिचा काटा कसा आणि कुठे काढायचा हे त्या दोघांनी ठरविले होते. मेहुणे पाहुणे दोघे ही एकमेकांना मदत करायला तयार झाला. आशा ही उल्हाहासनगरमध्ये त्याचेसोबत येऊन राहण्यासाठी तगादा लावीत असल्याने तो तिच्यावर चिडून होता. हिला आपण त्या कामाचे वेळोवेळी पैसे देऊन देखील ही बला आपल्या गळ्यात पडत आहे म्हणून तो ही तिचा कायमचा निकाल लावयला तयार झाला होता. कारण ती पैसे देऊन ही गप्प बसायला तयार नव्हती.उलट ती त्याला बदनाम करायला मागे पुढे पाहत नव्हती. मला तू पाहिजेस, तू मला ठेवून घे असे ती तगादा लावत होती. आशा ही भलतीच चालू निघाल्याने तो ही वैतागलेला होता. ही बया कधी कुठे येऊन आपल्या अब्रुचा पंचनामा करेल याची काही त्याला खात्री नव्हती. त्या अगोदरच हिचा गेम करून आपले काम पत्ते करूया असे त्याने ठरविले. दि.१४ जुन रोजी त्याने आशाला फोन करून उल्हासनगर येथे बोलावून घेतले. त्याच्या बोलविल्याने ती औरंगाबादहून तेथे आली. रात्रीच्या सुमारास त्याने स्वत:च्या वॅगनआरमध्ये बसवून तो तिच्या सोबत फिरत होता. त्याने तिला बाहेरच जेवू घातले. या भेटी दरम्यान ती त्याला मला तुझ्यासोबत उल्हासनगर येथेच राहयचे आहे.असे सांगत होती. तो तिला फक्त हो म्हणत होता. त्याच्या मनात मात्र वेगळेच होते. शेवटचे तिच्याबरोबर संबंध प्रस्थापित करायचे म्हणून त्याने तिच्यासोबत वॅगनआरमध्येच संबंध केले. रात्रीच्या दरम्यान तो तिला घेवून विठ्ठलवाडी येथील स्मशान भूमीजवळ आणले. तेथे जवळच मिर्ची धाबा होता.बाजूस मोकळे रान आणि निर्मनुष्य असे होते.तेथे रात्रीच्या अंधारात त्याने कार पार्कींग केली. तिचे तोंड चालुच होते. तुला मी त्या कामासाठी पाहिजे आहे आणि तुला मला ठेवून घ्यांयला नको असे ती बडबडत होती. तो ही तिला आपली बाजू समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत होता. पण ती मात्र त्याचे काहीच ऐकयाला तयार नव्हती. शेवटी त्या दोघांचे गाडीतच तू तू मै मै चालू होते. अशातच त्याने तिचा रागाने गळा आवळून धरला. ती ओरडण्याचा प्रयत्न करीत होती.पण त्याने आपल्या दोन्ही हाताची ताकद लावली असल्याने त्याच्या ताकदीपुढे ती फिकी पडली. त्यातच कारच्या काचा त्याने लावल्या असल्याने तिचा अवाज बाहेर ही जात नव्हता. तो तिच्यावर दात ओठ खात रागाने लाल होऊन तिला अर्वाच्च भाषेत शिवी देत तिचा गळा जोरात आवळून धरला होता. त्यामुळे तिचे काही चालले नाही.काही क्षणातच होत्याचे नव्हते झाले. ती निपचीप आणि गार झाली होती. तिचा आपल्या हातून खून झाला आहे हे त्याच्या लक्षात आल्यावर तो ही भानावर आला. इतक्या रात्री निर्मनुष्य स्थळी कार कुणी उभी केली आहे हे मिरची धाब्यावरच्या लोकांनी येवून पाहिले तर त्या कारच्या बाहेर पोलीस सचिन खाज जेकर हा उभा असल्याचे त्याना दिसले. सचिन हा पोलीस असल्याने धाब्यावरचे लोक त्याला ओळखत होते. कारमध्ये एका महिलेचा मृतदेह ही असल्याचे त्याच्या लक्षात आले. सचिनने त्या लोकांना तेथून जाण्यास सांगितले. या दरम्यान त्याने कारमधून बाहेर येवून आपला मेहुणा कल्पेश उर्फ केशव खैरनार याला फोन लावून बोलावून घेतले. तो आल्यानंतर ते दोघे ही आशाच्या मृतदेहाची विल्हेवाट लावणार होते. दरम्यान या घटनेची माहिती कुणी तरी जवळच असणाऱ्या विठ्ठलवाडी पोलीस स्टेशनला दिली. ते दोघे मृतदेहाची विल्हेवाट लावण्यापूर्वीच पोलीस तेथे पोहचले होते. त्यांनी घटनास्थळाची पाहणी व पंचनामा करून त्या दोघांना ताब्यात घेतले. खरे तर ही घटना ज्या हद्दीत घडली होती. ती हद्द हिललाईन पोलीस स्टेशनच्या हद्दीत येत होती. म्हरून विठ्ठलवाडी पोलीसांनी या दोघांना ताब्यात घेऊन हिललाईन पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिले. पोलीस या घटनेची चौकशी सचिन खाज जेकर याच्याकडे केली असता त्याने आपला गुन्हा कबुल कररून तो का ?आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली.त्यापूर्वी पोलीसांनी या घटनेची माहिती मयत आशा मोरे हिच्या औरंगाबाद येथील नातेवाईकांना दिली होती. तिच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी हिललाईन पोलीस स्टेशनमध्ये आशा मोरे (वय ५०) हिच्या खून प्रकरणी तिचा प्रियकर सचिन गोरखानाथ खाजजेकर (वय ३८) त्याचा मेहुणा कल्पेश उर्फ केशव खैरनार (वय ३१) रा.वीर तानाजी नगर उल्हासनगर याच्या विरोधात भा.दं.वी. ३०२,२०१,५११,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याना मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेली वॅगनआर कार जप्त केली होती. या घटनेचा पुढील तपास हिललाईन पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत.

## अल्पवयीन मुलीवर बलात्कार ...

वेगाने तपासाची चक्रे फिरवली आणि आरोपींना अटक करण्यात यश मिळवले आहे. सदर गंभीर घटनेची बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी तात्काळ दखल घेवून प्रशांत परदेशी उपविभागिय पोलीस अधिकारी जव्हार व पोलीस निरीक्षक अजय वसावे, प्रभारी अधिकारी स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली तपासकरिता वेगवेगळी पथके तयार केली. यापैकी पोलीस उपनिरीक्षक आशिष पाटील, स्थानिक गुन्हे शाखा, बोईसर युनिट यांनी त्यांचे पथकासह तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवून घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली. गुन्हयात अज्ञात आरोपीने कोणताही पुरावा मागे सोडला नसताना व सदर परिसरातील कोणतेही सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध झालेले नसतांना, घटनास्थळावरील परीस्थीती, मयताचे नातेवाईक यांचेकडे तपास केला. मयत मुलगी व तिचे सोबत गावातील एकुण १४ स्त्री पुरुष गावातच एका बांधकामाचे ठिकाणी मजुरीवर जात होते. घटनेच्या दिवशी नमुद बांधकामाचे ठिकाणी कामावर जाणारे स्त्री-पुरुषांची माहिती घेवून चौकशी करुन दोन संशयीत इसम १) वय २१ वर्षे, २) वय १९ वर्षे, दोन्ही रा. वडपाडा जामसर, ता. जव्हार यांना ताब्यात घेवून त्यांचेकडे कसून चौकशी केली असता, त्यांनी मयत ही तिचे शेतातील आंब्याची वाडी राखण्यासाठी गेली असता, संशयीतांनी तिचा पाठलाग करुन, तिस एकातांत गाठून तिचेवर अतिप्रसंग केला व ती सदर बाबत तिचे नातेवाईकांना सांगेल व त्यामुळे त्यांची गावामध्ये बदनामी होईल म्हणून नमुद इसमांनी दगडाने ठेचुन तिचा खून करुन, पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने तिचे प्रेत तांबडमाळ येथील शेत जमीनीतील चनालीत टाकून दिल्याची कबुली दिलेली आहे. सदरची कामगिरी श बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, यांचे आदेशान्वये प्रशांत परदेशी, उप विभागीय पोलीस अधिकारी, जव्हार व अजय वसावे, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, पालघर, अप्पासाहेब लेंगरे, प्रभारी अधिकारी, जव्हार यांचे मार्गदर्शनाखाली पोउनि आशिष पाटील, स्थागुशा बोईसर युनिट, पोउनि अहिरराव, मोखाडा पोलीस ठाणे, पोउपनि लोंढे, वाडा पोलीस ठाणे, पोहवा १०५६ दिपक राऊत, पोहवा १८१६ राजेंद्र पवार, पोहवा १११६ संतोष निकोळे, पोहवा १६८२ अमोल डॉब, पोना १२४० नरेंद्र पाटील, पोना ५८९ संजय धांगडा, पोना १६८१ दिनेश गायकवाड, पोअमं ३४३ वैभव जामदार, पोअंम नरेश घाटाळ सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा व जव्हार उपविभागातील पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

## एक कोटीच्या विम्यासाठी पत्नीचा...

अपघाताचा बनाव केला. पण पोलिसांनी हा बनाव हाणून पडला आणि आरोपींना अटक केली. अंकुशनगर बीड येथे मंचक गोविंद पवार हा आपल्या पत्नी मुलासह राहयला आहे. त्याची पत्नी गंगाबाई ही तशी हुशार आणि चालू होती. मंचक पवार याची घरची शेती असल्याने त्याची आर्थिक परिस्थीती ही उत्तम होती. वडिलार्जीत शेतीमुळे त्याच्या हातात नेहमी पैसा असायचा. त्याच्या पत्नीचे माहेर हे लातूर जिल्हयातील रेणापूर तालुक्यातील वाला हे असून ती सारखी आपल्या माहेरला जात असायची. त्यातूनच तिची ओळख ही बीड जिल्हयातील काकडहिरा येथील श्रीकृष्ण बागलाने याच्याबरोबर झाली होती. गंगाबाई हिला नवऱ्याच्या आर्थिक परिस्थितीची कल्पना होती.त्याच्याकडे भरपूर पैसा अडका आहे हे तिने हेरले होते. तसा मंचक हा काटकसरीने वागणारा होता. आवश्क खर्चाच्या ठिकाणी तो पैसा खर्च करीत होता. तर अनावश्क खर्च तो टाळत होता. कुटूंबाच्या भल्यासाठी आणि सुरक्षितेसाठी म्हणून त्याने गेल्या काही महिन्यापूर्वी १ कोटी रूपयांचा विमा उतरविला होता. तो विमा करीत असताना त्याने वारस म्हणून पत्नी गंगाबाई पवार हिचेच नाव लावलेले होते. त्या विम्याची चार पाच हप्ते देखील त्याने भरले होते. नवऱ्याने एवढया मोठया रक्कमेचा विमा केला असल्याचे बघून तिचे डोळे फिरले होते ही विम्याची रक्कम तिला नवरा अपघातात गेल्यानंतर मिळणार होती. नवरा अजून धडधाकट असून तो काही लवकर जाणार नाही आणि आपल्याला ती रक्कम काही मिळणार नाही याचा तिने सारासार विचार केला. आयुष्याच्या शेवटच्या टप्पयात पैसे काय कामाचे जवानीतच पैसे उपयोगाला येतात असा तिचा विचार होता.नवरा काही जात नाही आणि आपल्याला ती काही रक्कम मिळत नाही.मग काय करायचे याचा ती विचार करीत असताना जर आपण नवऱ्याचीच गेम केली आणि तो अपघातात गेला अशी व्यवस्था केली तर विमा कंपनीकडून नुकसान भरपाई म्हणून नवऱ्याने केलेली विम्याची १ कोटीची रक्कम आपल्याला मिळेल असे तिला वाटले.आता नवऱ्याला संपवायचे म्हणजे काय खेळ नव्हता. तशी तिच्या सुपीक डोक्यातून एक आयडीया बाहेर पडली. नवऱ्याच्या हत्येची सुपारी दिल्यावर ते लोक नवऱ्याला मारतील आणि आपण सांगितलेला बनाव ही करतील हे तिला चांगले माहित होते. काही काही बायकाचे डोके औरच चालते तसे तिचे ही चालले होते. नवऱ्याच्या पश्चात ती रक्कम आज ना उदया तिलाच मिळणार होती. पण त्या रक्कमेसाठी तिला थांबायची इच्छा नव्हती की धीर ही नव्हता. पैसासाठी ती स्वत:च्या हाताने स्वत:चे कुंकू पुसायला ती निघाली होती. ती बराच विचार करीत असताना तिला श्रीकृष्ण बागलाने हा तिच्या ओळखीचा आठविला. ती त्याला सहज म्हणून एकदा भेटायला गेली आणि आपल्या मनातील तिने त्याला बोहलून दाखविले. नवऱ्याला मारायास गंगाबाई सांगते म्हटल्यावर तो ही अढेवढे घेवू लागला होता. अखेर तिने त्याला दहा लाख रूपयांचे अमिष दाखविले त्यावेळी तो या कामासाठी तयार झाला. मंचक पवार याला मारण्याचे काम त्याच्या एकटयाच्या हातून होणार नव्हते. म्हणून त्याने या कामासाठी आपले आणखीन दोन मित्र तयार केले. आता गंगाबाईचे काम सोपे झाले होते. एवढे सगळे करून त्यांना दयायला गंगाबाईकडे पैसे कुठे होते. यातून ही तिने मार्ग काढला नवऱ्याच्यां पश्चात १ कोटी मलाच मिळणार आहेत त्यातील १० लाख रूपये मी तुम्हाला देते असे तिने त्यांना सांगितले. त्यांना ही पैशाची खात्री पटल्यावर ते ही तयार झाले.त्यासाठी त्यांनी एक प्लॅन केला. तशी श्रीकृष्ण बागलाने याची थोडीफार तोंडओळख ही मंचक पवार याच्याबरोबर होती. दि.१० जून रोजी त्याने मंचक याला आपण दारूची पार्टी करूया म्हणून पिंपर गव्हाण येथील एका शेत शिवारात बोलावून घेतले. दारू प्यायला मिळणार म्हणून तो ही आपली स्कुटी गाडी घेवून तेथे गेला.शेतशिवारात श्रीकृष्ण याचेबरोबर अगोदर तिघेजण होते. ते मंचक याच्या ओळखीचे नव्हते. त्या पार्टीत श्रीकृष्ण याने त्याची ओळख मंचक याच्याशी करून दिली.रात्रीच्या अंधारात पाच जणांची दारूची पार्टी रंगात आली होते. प्रत्येकजण आवाज चढवून बोलत होता. मंचक याने १ कोटी रूपयाचा विमा केला असून त्याचेकडे पैसा भरपूर आहे. पुढची पार्टी तो आपल्याला देणार आहे असे श्रीकृष्ण याने सांगितले. त्यावर दारूच्या नशेत असणाऱ्या मंचक याने ही हो म्हटले. प्रत्येकाला झिंग चढली होती. मंचक याला त्यांनी मुद्दामच जास्त दारू पाजली होती. त्यातच कशावरून तरी श्रीकृष्ण याने मंचकशी वाद उकरून काढला.त्या वादाला कारण ही नव्हते. तरी ही वाद चिघळत मुद्दमाच नेला आणि त्या चौघांनी मंचक याला मारहाण करायला सुरूवात केली. हाच डाव साधत श्रीकृष्ण याने मंचक याच्या पोटावर आणि तोंडावर आपल्याकडील चाकूने वार केले.त्यासरशी मंचक हा रक्ताच्या थारोळ्यात पडला. त्याचा मृत्यू झाल्याचे लक्षात येताच श्रीकृष्ण बागलाने आणि त्याच्या मित्रांनी त्याचा मृतदेह म्होसाबा फाटा परिसरातील रस्त्यावर आणून टाकला. त्याचबरोबर त्याच्या स्कुटीची नंबर प्लेट ही काढून टाकून त्याच्या मृतदेहापासून थोडया अंतरावर आडवी पाडून लावली व त्या स्कुटीला आयशरने धडक दिली. जेणेकरून रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनाने जोरदार धडक दिल्याने त्याचा अपघातात मृत्यू झाल्याचा बनाव करण्यात आला. या घटनेनंतर ते चौघे ही पळून गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी बीड पोलीसांना पिंपरगव्हाण म्होसाबा फाटयावर एका इसमाचा अपघातात मृत्यू झाल्याची माहिती मिळाली.पोलीसांनी घटनास्थळ गाठून घटनेचा पंचनामा केला.मृतदेह जेथे पडला होता. तेथे कुठेच रक्ताचे थारोळे नव्हते जर एखादया वाहनाने चिरडले असते तर त्या ठिकाणी रक्ताचे डाग अथवा रक्ताचे थारोळे साचलेले दिसले असते. तसेच घटनास्थळापासून लांब पर्यत मृतदेह ओढत आणल्याचे दिसत होते.घटनास्थळी नंबर प्लेट नसलेली स्कुटी मिळून आल्याने पोलीसांचा संशय आणखीनच बळावला. पोलीसांनी पंचनामा करून मृतदेहाची ओळख पटविण्याचे काम चालू केले. नंबर प्लेट नसलेली स्कुटी शेजारीच पडलेली होती. त्या स्कुटीच्या इंजीन नंबरवरून पोलीसांनी स्कुटी मालकाची ओळख काढली. ती स्कुटी बीड येथील अंकुशनगर येथील मंचक पवार याची असल्याची माहिती मिळाल्यावर पोलीसांनी तेथे जावून मंचक पवार याच्या पत्नी मुलाकडे चौकशी केली असता ते दोघे ही पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होते. येथेच पोलीसांना संशय आला होता. त्यातच पोस्टमार्टम रिपोर्टमध्ये पोटात शस्त्राने वार केल्याने रक्तस्त्राव होऊन मृत्यू असे लिहिलेले होते. पोलीस आता या घटनेचा तपास दुसऱ्या ॲंगलने करीत होते. याकामी पोलीसांनी आपल्या खबऱ्याना कामाला लावले होते. खबऱ्यांनी पोलीसांना माहिती दिली की, मयत मंचक पवार याने १ कोटी रूपयांचा विमा उतरविला असून बहुदा त्या रक्कमेसाठी त्याचा खून करण्यात आला असावा. यावरून पोलीसांनी मयत मंचक पवार याचे मोबाईल कॉलचे रेकॉर्ड व लोकेशन तपासले असता त्याच्या मोबाईलवरती काकडहिरा येथील श्रीकृष्ण बागलाने याचे बोलणे झाल्याचे समजले यावरून पोलिसांनी त्याला काकडहिरा येथून ताब्यात घेतले. त्याच्याकडे पोलीस या घटनेचा तपास करीत असताना त्याने पोलीसांना चक्रावून टाकणारी घटना सांगितली.मयत मंचक पवार याचे त्याच्याशी कुठले ही वैर नव्हते.किंवा भांडण तंटा नव्हता.त्याने १ कोटी रूपयांचा विमा उतरविला होता.ती रक्कम त्याच्या पत्नीला त्याच्या अपघाती मृत्यू नंतर मिळणार होती.त्या रक्कमेसाठी तिचे डोळे फिरले होते. म्हणून तिने नवरा मंचक पवार याला मारण्यासाठी मला व माझ्या तीन मित्रांना १० लाख रूपयांची सुपारी दिल्याचे सांगितले. यावरून या हत्येमागे मयत मंचक पवार याची पत्नीच असल्याचे पोलीसांना समजले. पोलिसांनी लगेच हालचाल करीत मयत मंचक पवार याची पत्नी गंगाबाई पवार, श्रीकृष्ण बागलाने, त्याचे मित्र सोमेश्वर वैजीनाथ गव्हाणे यांना ताब्यात घेतले. त्यांनी ही आपला गुन्हा कबुल केला.या घटनेतील इतर दोघे जण कथाशब्द बध्द होईपर्यत फरारी होते.या घटनेची लेखी फिर्याद मयत मंचक पवार याच्या भावाने बीड पोलीसात दाखल केल्यावर मंचक गोविंद पवार (वय ४२) याचा खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी त्याची पत्नी गंगाबाई पवार (वय ३७) रा.बीड, श्रीकृष्ण सखाराम बागलाने (वय ३५) रा.काकडहिरा जि.बीड त्याचा मित्र सोमेश्वर वैजिनाथ गव्हाने (वय ३२) रा.पारगाव सिरस या आणि इतर दोघा जणांच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला चाकू आणि आयशर टेम्पो जप्त केला.या घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक संजय तुपे, कैलास ठोंबरे, नशीर शेख, अभिमन्यू, सतीश कातखडे, अशोक दुबाले, गणेश हंगे, राहुल शिंदे, अश्विन सुरवसे, गणेश मराडे, संपत तादंळे, अतुल हराळे यांनी केला. या घटनेची माहिती प्रसार माध्यमांना पोलीसअधिक्षक नंदकुमार ठाकूर यांनी दिली. पैशासाठी रक्ताची नाती तर तुटतातच हे आपण पाहतो तर रक्ताच्या नात्यापलीकडील जन्माची नाती ही तुटतात हे या घटनेवरून दिसून येते. म्हणूनच माणसा पेक्षा माणसाचा पैसाच वैरी झाला असल्याचे म्हटले जाते. गंगाबाई हिला १ कोटी रूपयांची विम्याच्या रक्कमेची भुरळ पडली आणि तिने नवऱ्याला मारण्याची सुपारी दिली किती दुर्देवी ही घटना म्हणावी लागेल तिने स्वत:च्या हातानेच स्वत:चे कुंकू पुसले एवढे मात्र निश्चित म्हणावे लागेल.

## व्यसनाने संपवले बाप-लेकातले ...

साथीने आपल्या वडिलांचा दोरीने गळा आवळून खून केला. सविस्तर घटना अशी की बोपदेव घाटातील सेल्फी पॉइंट परिसरात अज्ञात मृतदेह आढळल्याची माहिती पोलिसांना मिळाली. कोंढवा पोलिसांनी मृतदेहाच्या फोटोवरून मृत व्यक्तीची ओळख पटविण्यास सुरूवात केली होती. १४ जूनला पोलिस अंमलदार तुषार अल्हाट यांना खबऱ्यामार्फत खून झालेल्या व्यक्तीचं नाव पवन शर्मा असून, तो मिस्त्री काम करत असल्याची माहिती मिळाली. मृत व्यक्ती नर्हे इथल्या मानाजीनर इथं राहण्यास आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी शर्मा याच्या घराचा पत्ता शोधून काढला. त्याच्या पत्नीकडे चौकशी केली असता, मुलगा सोनू आणि तिच्या बहिणीचा मुलगा शैलेंद्र याच्यासह एकत्र रहात असल्याचं तिने सांगितलं. पवन हा दारु पिऊन आल्यानंतर तिला आणि तिच्या मुलाला नेहमीच मारहाण करत असल्याची माहितीही पोलिसांना मिळाली. त्यामुळे पोलिसांच्या मनात संशयाची पाल चुकचुकली. आणि कसून तपास करण्यास सुरुवात केली. सोनू पवन शर्मा (वय.२५,रा.मानाजीनगर नर्हेगाव मुळ मध्यप्रदेश) आणि शैलेंद्र गोवर्धन अहिरवार (वय.२२,रा. नर्हेगाव मुळ मध्यप्रदेश) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. तर पवन देबू शर्मा (वय.४०,रा. मानाजीनगर नर्हे) असे खून झालेल्या व्यक्तीचं नाव आहे. १३ जून रोजी दारु पिऊन आल्यानंतर पवन याने सोनू आणि शैलेंद्र या दोघांना मारहाण केली होती. त्या रात्रीपासून हे दोघं घरी आले नव्हते. पोलिसांना संशय आल्याने दोघांचा शोध सुरू घेण्यास सुरूवात केली. त्यावेळी दोघे रेल्वे स्टेशन इथून मुळ गावी मध्यप्रदेशात पळून जाण्याच्या तयारीत असल्याचं समजलं. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्यांनी खूनाची कबुली दिली. त्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या हेतून मृतदेह दुचाकीवरून मध्यरात्री बोपदेव घाटातील सेल्फी पॉइंट परिसरात टाकून दिला होता. अतिशय कौशल्यपुर्वक तपास करून कोंढवा पोलिसांनी खूनाचा छडा लावून राज्याबाहेर रेल्वेने पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या आरोपी मुलाला आणि त्याच्या मावस भावाला रेल्वे स्टेशन इथून अटक करण्यात आली. क्षणभराच्या रागामुळे मुलानं बापाचा काटा काढला आणि आयुष्याचा नाश करुन घेतला...या घटनेमुळे चांगलं कुटुंब उध्वस्त झालं आहे. दरम्यान पवन शर्मा हा मुलगा सोनू आणि त्याची आई यशोदा या दोघांना दारु पिऊन आल्यानंतर सतत शिवीगाळ करून मारहाण करत होता. सतत होणाऱ्या त्रासाला सोनू कंटाळा होता. त्यातूनच त्याने वडील पवन याचा खून करण्याची योजना आखली. खून केल्यानंतर त्याचा मृतदेह कोठे टाकायचा यासाठी विविध ठिकाणची पाहणी केली. त्यासाठी त्यांनी बोपदेव घाटाची निवड केली. मध्यरात्रीच्यावेळी पवन याचा दोरीने गळा आवळून खून केल्यानंतर दुचाकीवरूनच त्याचा मृतदेह बोपदेव घाटात टाकून दिला. तसंच पोलिस आपल्याला पकडू नयेत म्हणून याची देखील खबरदारी घेतली. मात्र पोलिसांनी दोघांना दरभंगा एक्सप्रेसमधून बेड्या ठोकल्या.

## कर्जाची परतफेड करूनही त्याने ...

असते. एखाद्या विशीष्ट धैय्याने पछाडलेले लोक आपला हेतू साध्य करण्यासाठी पंगती घडवून आणतात. या पंगतीत अनेक निर्णय घेतले जातात. गुन्हेगारांची पंगत वारंवार घडत असते. या बैठक वजा पंगतीत कुणाचा गेम करायचा? कुणाकडे दरोडा टाकायचा? कुणाचा कसा आणि केव्हा काटा काढायचा? कुणाला फाटा द्यायचा? हे धोरण आणि नियोजन ठरत असते. अशा पंगती शक्यतो रात्री नऊ - दहा वाजेनंतर सुरु होतात आणि उशिरापर्यत चालतात. अंगी गुन्हेगारी वृत्ती असलेल्या टोळ्यांच्या पंगतीत मद्यपानाशिवाय कोणतेही धोरण आणि निर्णय ठरत नाही असे म्हटले जाते. सागर वासुदेव पाटील हा तरुण गुन्हेगारी वृत्ती असलेल्या मित्रांच्या संगतीत वाढला होता. गुन्हेगारी संगतीची पहिली पायरी तो अलगद चढला होता. त्यामुळे पुढील पंगतीच्या पायऱ्या भराभर चढण्यास त्याला अजिबात वेळ लागला नाही. जळगाव शहरातील कासमवाडी - इश्वर कॉलनी परिसरात राहणाऱ्या सागरचे अनेक मित्र होते. ते मित्र म्हणजे जणू काही गुन्हेगारांची बालवाडी होती. या बालवाडीतून पुढच्या टप्प्यातील पाठशाळेत त्याला गुन्हेगारीचे बाळकडू मिळाले. ते बाळकडू मिळाल्याने त्याला मद्याची चव कधीच कडू लागली नाही. त्याच्याविरुद्ध मारामारी, खून अर्थात शरीराविरुद्धचे गुन्हे दाखल झाले. सन २०१५ मधे सुरुवातीला प्राणघातक हल्ला व नंतर खूनात परिवर्तीत झालेल्या गुन्ह्यात त्याचा सहभाग होता. पंचमुखी हनुमान मंदीर परिसरात चंद्रकांत पाटील नामक तरुणाच्या हत्येत सहभाग असलेला सागर पाटील औरंगाबाद खंडपीठातून अपिल जामीनावर सुटून जेलच्या बाहेर आला होता. वरवर रिक्षा चालकाच्या भुमिकेत वावरणारा सागर आतून गुन्हेगारी कारवाया करत होता. गुन्हेगारीसोबत त्याची युती झाली होती. व्याजाने पैसे देणे आणि दडपशाही पद्धतीने ते वसुल करणे हा देखील त्याचा एक व्यवसाय होता. अवघा बारा वर्षाचा असतांना त्याचे वडील वारले होते. त्यामुळे आईशिवाय त्याच्यावर कुणाचे फारसे दडपण नव्हते. आई काही दिवसभर त्याच्यामागे काठी घेऊन फिरु शकत नव्हती. त्यामुळे कुसंगत घडण्यास त्याला वेळ लागला नाही. आजिम खान हा सागरचा मित्र होता. आजिमच्या माध्यमातून आरिफ शहा या तरुणासोबत सागरचा परिचय झाला. दोन वर्षाची ओळख झाल्यानंतर आरिफ हा सागरकडून गरजेनुसार वेळोवेळी उधार पैसे घेऊन ते व्याजासह परत करत होता. अनेकदा दोघेजण मद्यप्राशन करण्यास बसत होते. मजुरी करणा-या आरिफ शहा अयुब शहा यास ईद सणानिमीत्त पैशांची गरज होती. सण साजरा करण्यासाठी आरिफने सागरकडे व्याजाने दहा हजार रुपये मागितले. गुन्हेगारीत पारंगत झालेल्या सागरने आरिफला दहा हजार रुपये दिले. मात्र देतांना त्या घटनेचा एक व्हिडीओ तयार करुन घेतला. ईद सण साजरा केल्यानंतर आरिफने सागरला व्याजासह सतरा हजार रुपये परत केल्याचे आरिफचे म्हणणे होते. ३ जून रोजी दुपारच्या वेळी आरिफ व त्याच्यासोबत जुबेर शेख नावाचा त्याचा मित्र असे दोघे जण कासमवाडी परिसरातील मासळी बाजारात बसले होते. त्यावेळी सागर पाटील त्यांच्याजवळ आला. दहा हजार रुपये उधार घेतल्याचा व्हिडीओ सागरने आरिफ यास दाखवला. व्हिडीओ दाखवल्यानंतर सागरने आरिफला दहा हजार रुपयांची मागणी केली. लवकरात लवकर मला दहा हजार रुपये पाहिजे असा दम सागरने आरिफला दिला. जर मला पैसे मिळाले नाही तर हा व्हिडीओ मी तुझ्या घरी येऊन तुझ्या वडीलांना दाखवेन असा देखील सागरने त्याला दम भरला. मी व्याजासह सर्व पैसे तुला परत केले असून आता आपला कोणताही व्यवहार राहिलेला नाही असे आरिफने सागरला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र सागर त्याचे काहीही ऐकून घेण्याच्या तयारीत नव्हता. तु कसा पैसे देत नाही...... तुझा बाप पैसे देईल अशी धमकी दिल्यानंतरच सागर तेथून गेला. रात्री अकरा वाजेच्या सुमारास सागर पाटील, त्याचा साथीदार पवन भंगाळे व इतर दोघे अशा चौघांची मद्यपानाची पंगत बसली होती. निंबाच्या झाडाखाली बसून या पंगतीच्या घटनेचे लाईव्ह आरिफ शहा अयुब शहा व त्याचा साथीदार जुबेर शेख भिका सिगलीकर हे दोघे बघत होते. रात्री बाराच्या ठोक्याला चौघा मित्रांच्या पंगतीचा समारोप झाला. पवन भंगाळे याने सागरला मोटार सायकलवर बसवून त्याच्या घराकडे नेले. मात्र काही वेळातच सागरच्या मनात काय आले कुणास ठाऊक? मद्यपान केल्यानंतर सुखासुखी आपल्या घराच्या दिशेने गेलेला सागर पुन्हा आरिफकडे चालत आला. तो आरिफच्या दिशेने नव्हे तर त्याच्या मृत्यूच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे त्याला माहीतच नव्हते. ते केवळ नियतीला ठाऊक होते. रात्र बरीच झाली होती. तरी देखील सागरने आरिफला मद्यपान करण्यासाठी सोबत येण्याचे जणू काही फर्मान सोडले. कधीही, केव्हाही मद्य मिळण्याचे एकमेव कुप्रसिद्ध ठिकाण असलेल्या कंजरवाड्यातून सागरने एक बिअरची बाटली आणली. याशिवाय त्याने त्याच्या घरातून दुसरी बिअरची बाटली देखील आणली. अशा प्रकारे दोन बिअरच्या बाटल्या जमल्यानंतर सागर, आरिफ आणि जुबेर असे तिघे जण कासमवाडी परिसरातील मासळी बाजारजवळ मद्यपान करण्यास बसले. तिघांनी मिळून बिअरच्या दोन बाटल्या रिचवल्या. त्यानंतर अगोदरच फुल चार्ज झालेला सागर अजूनच ओव्हरचार्ज झाला. बेतापेक्षा जास्त चार्ज झालेल्या सागरने मद्याच्या नशेत आरिफला दहा हजार रुपये मागण्यास सुरुवात केली. त्यानंतर शब्दामागे शब्द वाढत गेला. आरिफदेखील यावेळी सागरच्या पैसे मागणीमुळे त्रस्त झाला होता. त्याची पैशांची मागणी काही केल्या संपत नव्हती. अखेर आरिफची सहनशिलता संपली. मासळी बाजारातील एका दुकानदाराच्या ओट्याजवळ वाहनाच्या शॉकअपचा रॉड पडलेला होता. मासळी ठेवण्यासाठी वापरण्यात येणारा बर्फ फोडण्यासाठी तो रॉड वापरला जात होता. तो रॉड सागरच्या मृत्युसाठीच त्या रात्री त्याठिकाणी जणू काही पडलेला होता. ते विधीलिखीत होते. आरिफने तो रॉड उचलून सागरच्या डोक्यावर आठ ते नऊ वेळा सपासप मारला. अवजड शॉकअपचे डोक्यात वार झाल्यामुळे बिअरचा शेवटचा घोट घेत सागर जमीनीवर कोसळला. दरम्यान सागरच्या मोबाईलवर त्याच्या आईचे घरुन सारखे सारखे फोन येऊ लागले. जुबेरने ते कॉल कट करुन तो मोबाईल आरिफजवळ दिला. आरिफने तो मोबाईल पुन्हा सागरच्या खिशात ठेवून दिला. आतापर्यंत मद्याच्या नशेत बरळणारा आणि दहा हजार रुपयांची मागणी करुन आरिफला जेरीस आणणारा सागर रक्ताच्या थारोळ्यात निपचीप पडला होता. त्याचे डोके फुटले होते. सागर जीवानिशी गेल्याचे बघून आरिफ व जुबेर या दोघांनी तेथून अजिंठा चौफुली गाठली. पळून जाण्यासाठी कोणतेही वाहन मिळत नसल्याचे बघून दोघांनी रेल्वे स्टेशनच्या दिशेने जाणा-या रिक्षात बसून रेल्वे स्टेशन गाठले. मिळेल त्या रेल्वेने पळून जाण्याचा विचार दोघांनी केला. मात्र या कालावधीत रेल्वे नसल्याचे बघून दोघांनी पुन्हा रिक्षाने अजिंठा चौफुली गाठली. अजिंठा चौफुलीपासून दोघे एमआयडीसी परिसरातील भाजीपाला मार्केट पर्यत पायी चालत आले. त्याठिकाणी दोघांनी काही वेळ घालवला. बघता बघता सकाळ होण्यास वेळ लागला नाही. वेळ घालवण्यासाठी दोघांनी शेरा चौकात येऊन सुरेशदादा कॉम्प्लेक्सच्या गच्चीवर जाऊन वेळ घालवला. त्यानंतर सकाळी पाच वाजता त्यांना महामार्गावर पाळधीच्या दिशेने जाणारी एक रिक्षा मिळाली. त्या रिक्षात बसून दोघे जण पाळधी येथे एका ढाब्यावर आले. ढाब्यावरील एका टपरीवर दोघांनी चहा घेतली. त्यानंतर सकाळी आठ वाजता त्यांना धरणगाव येथे जाणारी एक लक्झरी बस मिळाली. त्या बसने दोघे धरणगावला गेले. धरणगावच्या मुख्य रस्त्यावरील चौकात पुतळ्याजवळ त्यांना लक्झरी बस चालकाने उतरवून दिले. दरम्यान इकडे जळगावला कासमवाडी परिसरातील घटनास्थळावर बघ्यांची गर्दी जमण्यास सुरुवात झाली होती. तरुणाची डोके ठेचून हत्या झाल्याची वार्ता परिसरात आणि शहरात पसरण्यास वेळ लागला नाही. या घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त पोलिस अधिक्षक चंद्रकांत गवळी, सहायक पोलिस अधिक्षक कुमार चिंता, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरणकुमार बकाले, एमआयडीसी पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक प्रताप शिकारे आणि त्यांच्या गुन्हे शोध पथकातील सहायक फौजदार अतुल वंजारी, हे.कॉ. दिपक चौधरी, राजेंद्र कांडेकर, पोलिस नाईक इमरान सैय्यद, सुधीर साळवे, किशोर पाटील, गोविंदा पाटील, मुकेश पाटील व सचिन पाटील तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे हे.कॉ. सुधाकर अंभोरे, सुनिल दामोदरे, अक्रम शेख, महेश महाजन, पोलिस नाईक विजय शामराव पाटील, अविनाश देवरे, पो.कॉ. सचिन महाजन, पंकज शिंदे आदींनी घटनास्थळ गाठले. सदर मृतदेह बघून तो पोलिसांच्या अभिलेख्यावरील गुन्हेगार व यापुर्वी सन २०१५ मधील खूनाच्या गुन्ह्यातील आरोपी सागर वासुदेव पाटील असल्याचे निष्पन्न होण्यास वेळ लागला नाही. अशा प्रकारे मयताची ओळख पटली. त्याची हत्या कुणी व कशासाठी केली याचा उलगडा होणे गरजेचे होते. मयताची ओळख पटल्यानंतर खात्री करुन घेण्यासाठी मयत सागर पाटील याच्या आईला घटनास्थळी बोलावण्यात आले. त्याच्या आईने मृतदेह बघून तो आपलाच मुलगा सागर असल्याचे ओळखले. एमआयडीसी पोलिस स्टेशनचे सहायक फौजदार अतुल वंजारी, इमरान सैय्यद, सचिन पाटील, किशोर पाटील, गोविंदा पाटील, सुधीर साळवे आदींच्या पथकाने मयताला शेवटचे कुणी पाहिले? त्याच्यासोबत रात्री कोण कोण होते? आदींबाबत परिसरात चौकशी केली. या चौकशीअंती त्याचे मित्र आरिफ शहा अयुब शहा व त्याचा साथीदार जुबेर शेख भिका सिगलीकर या दोघांची नावे पुढे आली. याप्रकरणी मयत सागरची आई विमल पाटील यांच्या फिर्यादीनुसार सदर खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा एमआयडीसी पोलिस स्टेशनला भाग ५ गु.र.न. ४१६/२०२२ भा.द.वि. ३०२, ३४ नुसार दाखल करण्यात आला. या गुन्ह्यातील फरार आरोपीतांचा शोध घेण्याचे काम स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने युद्ध पातळीवर सुरु केले. दरम्यान धरणगाव येथील आरिफची मामी बिल्कीस बी मजीद यांच्याकडे बंगाली फाईल येथे दोघे आश्रयाला गेले. मात्र दोघे जण गुन्हा करुन आपल्याकडे आश्रयाला आल्याचे समजताच मामीने दोघांना त्यांच्याकडे राहण्यास विरोध केला. त्यामुळे दोघांनी मामीकडे पटापट जेवण करुन अमळनेर गाठले. दरम्यान खबरी, सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन आणि सर्व तांत्रीक मदतीच्या आधारे माहिती घेत स्थानिक गुन्हे शाखेचा तपास वेगाने पुढे सरकत होता. दोघे जण अमळनेरला गेले असल्याचे स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार बकाले यांना समजले. त्या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील हे.कॉ. सुधाकर अंभोरे, सुनिल दामोदरे, अक्रम शेख, महेश महाजन, पोलिस नाईक विजय शामराव पाटील, अविनाश देवरे, पो.कॉ. सचिन महाजन, पंकज शिंदे आदींनी अमळनेर शहर गाठले. अमळनेर शहरातील बुलढाणा अर्बन बँकेनजीक झाडाच्या सावलीत दोघे जण उभे असतांनाच त्यांच्या संशयास्पद हालचाली लक्षात घेत एलसीबी पथकाने त्यांच्यावर शिताफीने झडप घालत त्यांना ताब्यात घेतले. अरे दादा...... हमे क्यो पकड रहे हो.... हमने क्या किया असे म्हणत दोघे जण आपला बचाव करु लागले. मात्र पोलिस पथकापुढे त्यांचा फार वेळ निभाव लागू शकला नाही. अखेर त्यांनी आपला गुन्हा कबुल करत पथकापुढे शरणागती पत्करत स्वत:ला त्यांच्या स्वाधीन केले. दोघांना जळगावला आणल्यानंतर पुढील तपासकामी त्यांना एमआयडीसी पोलिस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले. अशा प्रकारे गुन्हा उघडकीस आल्यानंतर अवघ्या आठ तासांच्या आत या गुन्ह्यातील दोघा संशयीत आरोपींना अटक करण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस निरीक्षक प्रताप शिकारे व त्यांचे सहकारी हे.कॉ. राजेंद्र कांडेकर करत आहेत.

## वॉचमॅनची हत्या करून भंगार चोरांनी ...

काम करणाऱ्या ग्यानबहादुर भिमबहादुर गुरुम (वय ६४) या वॉचमनची कोणीतरी हत्या केल्याची माहिती त्यांनी पोलिसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच मानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शेखर बागडे, पो.निरी. बाळासाहेब पवार, अनिल पडवळ, स.पो.नि. सुनिल तारमळे, अविनाश वनवे, अनिल भिसे, सुरेश डांबरे इत्यादीचे पथक तातडीने मानपाडा पोलीस ठाणेचे हद्दीतील एम.आय.डी.सी. फेज १, डोंबिवली (पुर्व) येथील विजय पेपर प्रॉडक्ट मिल या कंपनीत दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळची पहाणी केली असता, वॉचमन ग्याबहादुर गुरुम यांची कोणत्यातरी टणक हत्याराने, त्यांच्या डोक्यावर, डोळयावर, कानाचे वरील भागावार मारहाण करुन हत्या केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत होते. तसेच कंपनीतील आत् मधील पाहणी केली असता ऑफिसमध्ये ठेवलेले १ लाख ५० हजार ५०० रुपये किंमतीचा भंगाराचा माल चोरी करुन नेल्याचे दिसून आले. पोलिसांनी घटनास्थळचा पंचनामा करून जसवंतसिंग रणबहादुर ठाकुर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मानपाडा पो.स्टे . गु.र.क्र, ४६३ / २०२२ भादविक ४६० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर या खुनाच्या गुन्ह्याचा तपास सुरु झाला. मानपाडा पोलीस ठाणेचे वपोनिरी. शेखर बागडे यांनी वरीष्ठांचे मार्गदर्शनाखाली तात्काळ वेगवेगळी पथके तयार करून या पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना गुन्हा उघडकीस आणणेसाठी योग्य त्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे पथकांनी परीसरातील सीसीटीव्ही फुटेज चेक केले. त्यात या कंपनीत तीन इसम प्रवेश करीत असल्याचे तसेच ते भंगार चोरी केल्यानंतर एका ऑटो रिक्षातुन जात असल्याचे आढळून आले. ऑटो रिक्षाचे मागे एबीपी माझा परीवाराकडुन एबीपी वेडींग नावाचा बॅनर लावलेला होता, त्याप्रमाणे कल्याण व डोंबिवली परीसरातील सर्व ऑटो रिक्षांची तपासणी करण्यात आली. त्यात एका ऑटो रिक्षावर लागलेला बॅनर कापलेला असल्याचे तपास पथकास आढळून आले. तपास पथकाने त्या रिक्षाचा पाठलाग करुन ती रिक्षा अडवली. रिक्षा ड्रायव्हर पोलीसांना पाहुन पळुन जावु लागला. त्यास तपास पथकाचे अंमलदारांनी पकडले. त्याचेकडे चौकशी केली असता, त्याने त्याचे नांव टोनी थॉमस डिसिल्व्हा उर्फ शिवा सोमा हिलम (वय ३०) रा. सुचकनाका, कल्याण (पुर्व) असे सांगितले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याची अधिक चौकशी केली असता, त्याने सुरुवातीला बोलण्यास नकार दिला. त्याला आढेवेढे घेतले असता त्याने त्याच्या साथीदारांचे मदतीने वरील गुन्हा केल्याची कबुली दिली. दि.१५ जून रोजी रात्रौ २ वा.चे सुमारास ऑटो रिक्षा क्र. एम. एच ०५ डीक्यु ६९३२ मधुन तो आणि त्याचे साथीदार हे डोंबिवली (पुर्व) येथील विजय पेपर प्रॉडक्ट मिल या कंपनीचे जवळ आले. त्यानंतर त्यांनी कंपनीचे भिंतीवरुन उडी मारुन कंपनीत प्रवेश केला. त्यांना कंपनीत चोरी करायची होती. त्या बेताने ते रात्री त्याठिकाणी आले. कंपनीत रात्री कोणी नव्हते. कंपनीचा वॉचमॅन होता. पण तो झोपलेला होता. आरोपी हे कंपनीत प्रवेश करून माल चोरी करण्यासाठी कंपनीचे ऑफिसचा दरवाजा तोडत होते. त्या आवाजाने वॉचमन ग्यानबहादुर यास जाग आल्याने त्याने आरडाओरड करण्यास सुरवात केली. त्यावेळी आरोपीत यांनी त्यास तेथेच पडलेल्या एका रॉडने वॉचमन ग्यानबहादुर याचे डोक्यात रॉड मारुन त्यास जीवे ठार मारुन त्याचे खिशात असलेली चावी घेवुन त्या चावीने ऑफिसचा दरवाजा उघडुन त्यात ठेवलेले दिड लाख रुपये किमतीचा कासा, तांबे, पितळी वॉल व इतर भंगाराचे तुकडे असा सुमारे ४०० कि. ग्रॅम वजनाचा माल तसेच वॉचमनचे खिशात असलेला मोबाईल असे चोरी करुन तेथुन पळून गेले. त्यानंतर त्यांनी सकाळी तो चोरी केलेला माल कोळशेवाडी येथील भंगारवाला फिरोज इस्माईल खान यास १० हजार रुपयांना विक्री करुन मिळालेले पैसे तिनही आरोपींनी आपसांत वाटुन घेतले. अशी कबुली संशयित आरोपीने दिल्याने या गुन्हयात आरोपी टोनी थॉमस डिसिल्व्हा उर्फ शिवा सोमा हिलम (वय ३०) व फिरोज इस्माईल खान (वय ३०) रा. कोळशेवाडी, कल्याण पुर्व या दोघांना अटक करण्यात आलेली आहे. त्याचेकडुन गुन्हयात वापरलेली ऑटो रिक्षा क्र एम. एच ०५ डीक्यु ६९३२ व चोरीस नेलेले सर्व भंगार जप्त करण्यात आले आहे. या गुन्हयात आरोपींबाबत कोणतीही माहिती नसतानाही केवळ एबीपी माझा परीवाराकडुन एबीपी वेडींग नावाचा बॅनर ऑटो रिक्षावर लावलेला असल्याचे आढळून आल्याने, त्याआधारे मानपाडा पोलीस ठाणेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी अथक प्रयत्न करुन सदरचा गुन्हा १२ तासाचे आंत उघडकीस आणलेला आहे. ही कामगिरी दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, कल्याण परीमंडळ ३ चे पोलीस उप आयुक्त, परीमंडळ ३ सचिन गुंजाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त सुनिल कुराडे यांच्या मार्गदर्शनाखाली मानपाडा पोलीस स्टेशनचे वपोनि. शेखर बागडे, पोनिरी. बाळासाहेब पवार, पोनिरी. अनिल पडवळ, सपोनिरी अविनाश वनवे, सपोनिरी अनिल भिसे, सपोनिरी. सुरेश डांबरे, सपोनिरी सुनिल तारमळे, पोहवा. राजेंद्र खिलारे, विजय कोळी, भानुदास काटकर, सोमनाथ टिकेकर, सुधीर कदम, सुशिल हांडे, संतोष चौधरी, पोना. शांताराम कसबे, संजु मासाळ, प्रविण किनरे, देवा पवार, यलप्पा पाटील, दिपक गडगे, प्रशांत वानखेडे, अशोक कोकोडे, सुशांत तांबे, पोशि. तारांचद सोनवने, संतोष वायकर, रत्नदिप चौधरी यांचे पथकाने उघडकीस आणले.

20 TO 26 JUNE 2022 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 18/06/2022 10:19 PM Page 1



# लातूरमध्ये ६२ लाखांचे दोन टन चंदन जप्त



**लातूर/करकरे अंबादास**

पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांनी अवैध धंद्यावर कार्यवाही करण्याकरिता सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी व ठाणे प्रमुखांना आदेशित केले होते. त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांचे मार्गदर्शनात आज दि. १७/०६/२०२२ रोजी सकाळी ०७:०० वाजण्याच्या सुमारास निकेतन कदम, सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग चाकुर यांना गुप्त माहिती मिळाली की, येरोळ मोडवरुन कबनसांगवी मार्गे एक सिल्व्हर रंगाचे मारूती सुझुकी अल्टो गाडीमधून प्रतिबंधीत व संरक्षित चंदन वृक्षाची लाकुड चोरी करुन चोरटी विक्री करण्यासाठी घेवुन जात आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने सहायक पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांनी पोलीस निरीक्षक बाळकृष्ण मोहिते यांचे नेतृत्वात पोलीस स्टेशन चाकुर येथील अधिकारी व आमदारांचे पथक तयार करून त्यांना मार्गदर्शन व सूचना देऊन रवाना केले. सदर पथकाने नमूद ठिकाणी सापळा लावला तेव्हा सकाळी ०८३० वा. सुमारास मौजे कबनसांगवी जवळ एक सिल्व्हर रंगाची अल्टो गाडी क्र. एम एच जे सी-३९३५ ही येत असल्याची दिसली. पथकाने सदर गाडीस थांबवण्याचा इशारा केला असता ती गाडी न थांबवता पुढे निघून गेली. सदरची गाडी थोड्या अंतरावर थांबण्यास भाग पाडुन सदर गाडीतील इसमास गाडी खाली उतरवुन गाडीची तपासणी केली असता गाडीमध्ये ११ बॅग चंदन दिसुन आले. सदर इसमास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव साईनाथ अश्रूबा पुट्टे वय ४३ वर्षे, रा. सताळा ता उदगीर जि. लातुर असे असल्याचे सांगुन त्याने वेगवेगळ्या ठिकाणाहुन आलेला माल तो त्याचे शेतातील आखाड्यावर मौजे सताळा शिवार ता उदगीर जि लातुर येथे ठेवत असल्याची माहिती दिली त्यावरून नमूद इसमाच्या फार्महाऊसवर गेले असता साईनाथ पुट्टे यांचे आखाड्याचे शेडचे पाठीमागील बाजुस अशोक लिलँड ट्रक मध्ये दोन इसम चंदनाच्या धपल्या व लाकडे भरत असल्याचे दिसले. त्यांच्याकडे विचारपूस करून साईनाथ पुट्टे यांचे शेडचे समोरील उकंड्याचे बाजुस असलेल्या हौदात उतरुन पाहणी केली असता त्यात चंदनाचे लाकडे व धपल्या असलेल्या बॅग मिळून आल्या. वरील कारवाई मध्ये जवळपास ०२ टन चंदन (१९५७ ज्ञस) अंदाजे किंमत ४० लाख आणि इतर असे एकूण ६२ लाखाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. चाकूर पोलीस स्टेशनचे पोलीस अमलदार पाराजी गंगाधर पुठ्ठेवाड यांचे फिर्यादीवरून पोलीस स्टेशन चाकूर येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक २२४/२०२२ कलम ३७९, ३४ भादवी, कलम ४१, ४२ भारतीय वन अधिनियम १९२७ व कलम ०४ महाराष्ट्र वृक्ष तोड अधिनियम प्रमाणे आरोपी साईनाथ अश्रूबा पुट्टे, पत्ता: सताळा ता उदगीर, लातूर, लतीफ अहमद कुट्टी पत्ता: केरळ, गिरीशकुमार वेल्लुतिरी पत्ता: केरळ यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरील चंदनाचे मुद्देमाल कुठे वाहतूक केला जातो. त्याबद्दल अधिक तपास करण्यात येत आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे आणि अप्पर पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलिस अधिक्षक निकेतन कदम यांचे नेतृत्वात पोलीस निरीक्षक बालाजी मोहिते, पोलीस अमलदार साहेबराव हाके,सूर्यकांत कलम, पिराजी पुट्टेवाड, बाळू अरदवाड, रायभोले आणि रितेश अंधोरिकर यांनी केली आहे.

# पंचायती राज समितीच्या जिल्हा परिषदेच्या कामकाजाचा घेतला आढावा




**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

राज्याची पंचायती राज समिती बुधवारपासून सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहे. त्यांनी जिल्ह्यातील कामकाजाला सुरूवात केली आहे. आज जिल्हा परिषदेच्या कामकाजाचा आढावा घेऊन विभागप्रमुखांना विविध सूचना केल्या. पंचायत राज समितीचे अध्यक्ष संजय रायमूलकर यांच्या अध्यक्षतेखाली पहिल्या दिवशी सकाळी शासकीय विश्रामगृहात स्थानिक आमदार यांच्यासोबत जिल्ह्यातील प्रश्न, अडीअडचणी, सूचना याबाबत समितीने चर्चा केली. समितीने जिल्हा परिषदेमध्ये २०१५-१६, २०१६-१७च्या लेखा परीक्षण पुनर्विलोकन अहवालाबाबत प्रत्येक विभागाचा आढावा घेण्यात आला. समिती सदस्य, अध्यक्ष यांनी कामाबाबत सूचना केल्या. समिती सदस्यांमध्ये सर्वश्री आमदार विक्रम काळे, कैलास पाटील, अनिल पाटील, सदाशिव खोत, महादेव जानकर, शेखर निकम, माधवराव पवार, डॉ देवराव होळी, कृष्णा गजबे, विजय रहांगडाले, किशोर जोरगेवार, अंबादास दानवे, किशोर दराडे, रत्नाकर गुट्टे यांचा समावेश आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी दोन वर्षात जिल्हा परिषदेने राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती दिली. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, मुख्य वित्त व लेखा अधिकारी अजयसिंह पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शितलकुमार जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंचल पाटील आदींसह विभागप्रमुख उपस्थित होते. उद्या समिती पंचायत समिती, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद शाळा यांना भेटी देऊन पाहणी करणार आहेत. गटविकास अधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांसोबत बैठका होणार आहेत.

**सायकल बँक उपक्रमास चालना**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांना सायकल नसल्याने मुली शाळेत जात नसल्याची बाब समजल्याने त्यांनी लोकसहभागातून सायकल बँक तयार केली. या उपक्रमाची माहिती पंचायती राज समितीच्या अध्यक्ष श्री. रायमूलकर आणि सदस्यांना समजल्यानंतर सर्वांनी एकमताने या उपक्रमाला चालना देण्याचा ठराव केला. त्यानुसार १६ सदस्यांनी १६ सायकली जिल्हा परिषदेला भेट दिल्या. ग्रामीण भागातील गरीब मुली उच्च शिक्षीत झाल्या पाहिजेत. सायकलीविना त्यांचे शिक्षण अर्धवट राहू नये, या सामाजिक जाणिवेतून सायकल बँकेला मदत करण्याचे ठरले. या उपक्रमाला प्रोत्साहन दिले तर गरीब, होतकरू मुली शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत, असे रायमूलकर यांनी सांगितले.

# देवणी येथील आबासाहेब इंग्लिश स्कूलचा दहावीचा १०० टक्के निकाल

**देवणी/प्रतिनिधी**







महाराष्ट्र राज्य माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२२चा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. देवणी येथील आबासाहेब इंग्लिश स्कूलचा इयत्ता १० वी चा निकाल शंभर टक्के लागला आहे. टोनकाकाटे अंबादास बाबुराव याने ९५.२० टक्के गुण घेवून तालुक्यातून व शाळेतुन पहिला येण्याचा मान पटकावला आहे. शुभम लांडगे याने ९४.८० टक्के गुण घेवून तालुक्यातून व शाळेतुन सर्व व्दितीय आला आहे. तर रोहन दारनुळे याने ९१.६० टक्के गुण संपादन करुन तालुक्यातून आणि शाळेतून तृतीय आला आहे. माने हरी ९०.६० टक्के आणि मनोज बलटे ८८.८० टक्के गुण संपादन करुन घवघवीत यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे आबासाहेब इंग्लिश स्कूल ची इयत्ता १० वी ची हि पहिलीच बॅच आहे. पहिल्याच बॅचचा शंभर टक्के निकाल लागला आहे. तसेच आबासाहेब इंग्लीश स्कूल चा निकाल हा तालुक्यात प्रथम लागल्यामुळे संस्था अध्यक्ष गोविंदराव भोपनिकर, संस्था सचिव गजानन भोपनिकर, इंग्लिश स्कूलचे प्राचार्य सुप्रिया कांबळे व सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करुन त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच गुणवत्तापुर्ण शिक्षण देणाऱ्या सर्व स्टाफचे देखील यावेळी अभिनंदन केले.

# आदर्श शिक्षक रामलिंग तत्तापुरे यांना सामाजिक समता-शिवा पुरस्कार जाहीर

**अहमदपूर/प्रतिनिधी**



वीरमठ संस्थान आणि उपक्रमशील आदर्श शिक्षक रामलिंग तत्तापुरे यांना महाराष्ट्र शासनाचा महात्मा बसवेश्वर सामाजिक समता- शिवा पुरस्कार जाहीर. महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्यावतीने दिले जाणारे महात्मा बसवेश्र्वर सामाजिक समता शिवा पुरस्कार वैयक्तिक आणि संस्थेचे पुरस्काराचे लातूर जिल्ह्यात दोन मानकरी. स्वर्गवाशी राष्ट्रसंत परम पूज्य डॉ .शिवलिंग शिवाचार्य महाराज यांनी जीवनभर समाजासाठी केलेल्या कार्याची पावती त्यांच्या संस्थेला वीरमठ संस्थेला सन १९१८-१९ चा पुरस्कार आणि यशवंत विद्यालय अहमदपूर येथील उपक्रमशील आदर्श शिक्षक जेष्ठ पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते श्री. रामलिंग बापूराव तत्तापुरे यांच्या शैक्षणिक, सामाजिक, संस्कृतिक, धार्मिक कार्याचे मूल्यमापन करून त्यांना २०२०-२०२१ चा महात्मा बसवेश्र्वर सामाजिक समता शिवा पुरस्कार नुकताच जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराचे स्वरूप व्यक्तीला पंचवीस हजार रुपये रोख, संस्थेला ५१ हजार रुपये रोख, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ आणि पुष्पहार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान केला जाणार आहे.सदरचा पुरस्कार वितरण सोहळा मुंबई येथे जुलैच्या पहिल्या आठवड्यात यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे ,उपमुख्यमंत्री अजित पवार शिवा संघटनेचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.पुरस्काराचे आलेले २५ हजार रुपयांची रक्कम दीन, दलित, उपेक्षित, गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी देणार असल्याचे पुरस्कार विजेते रामलिंग तत्तापुरे यांनी क्राईम संध्या अहमदपूर प्रतिनिधी फिरोज शेख यांच्याशी बोलताना सांगितले.

# देवणीतील भोपणी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमन पदी गोविंदराव भोपणीकर!



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील मौजे येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या बिनविरोध चेअरमन पदी गोविंदराव भोपणीकर यांची निवड करण्यात आली तर व्हाईस चेअरमन पदी शालुबाई बालाजीराव दोडके यांची निवड करण्यात आली. निवडणूक अधिकारी म्हणून एस.एल.अहिलवार यांनी काम पाहिले, नवनिर्वाचित सदस्य मनोहराव वैजनाथ पाटील, मोरे सोपानराव बापुराव दोडके लक्ष्मीबाई लक्ष्मण मोरे, नारायणराव दौलतराव दोडके, व्यंकटराव दोडके नारायण मोरे, हरिश्चंद्र बिरादार घुंगरबाई, स्वामी बस्वराज, अंजुरे गोरख इत्यादी सदस्य उपस्थित होते. नुतन पदाधिकाऱ्यांचे सत्कार करण्यात आले. यावेळी माजी सरपंच, रामराव भोपनिकर, सरपंच लक्ष्मण डोपेवाड, बालाजी दोडके, सिद्राम पाटील, गजानन भोपनिकर, विनायक मोरे, तानाजी मोरे, त्र्यंबक मोरे, अविनाश दोडके, रणजित दोडके, मदन बिरादार, नागनाथ बिरादार, शंतनू मोरे, श्रीरंग दगडे, बाबुराव पारसेवार, विनोद बिरादार, प्रशांत गुरधाळे सह गावातील नागरिक उपस्थित होते.

# राजमाता जिजाऊ ग्रुपतर्फे आर्थिक मदत



**वाडा/प्रतिनिधी**

जिजामाता नगर वाशिंद येथील सरस्वती दळवी या गेल्या दोन महिन्या पासून सतत आजारी असून घरची परिस्थिती अत्यंत बिकट असताना सतत आजार पण व आई कडे लक्ष दियाला कोणी नसल्या कारणाने त्यांचा मुलगा योगेश दळवी यांना आईची देखभाल करण्यासाठी नोकरी सोडावी लागली आहे. याची माहिती मिळताच वाड्यातील राजमाता जिजाऊ समाज ग्रुपच्या वतीने दळवी यांना आर्थिक मदत करण्यात आली. वाडा तालुक्यातील कोणे ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच अश्विनी मोरे यांच्या संकल्पनेतू तयार झालेल्या राजमाता जिजाऊ समाज ग्रुपचे सदस्य बाळाराम हरड, वाशिंद येथील सामाजिक कार्यकर्ते संजय हरड, तानाजी कदम, प्रमोद दळवी, किरण मरले माथाडी कामगार वसई युनियन अध्यक्ष, दिलीप पालव (LIC ऑफिसर ठाणे) विनोद म्हस्कर (LIC एजन्ट ठाणे) यांनी राजमाता जिजाऊ पुण्यतिथी निमित्त सरस्वती दळवी यांच्या औषध उपचारसाठी आर्थिक साहाय्य केले. समजातील आरोग्य व शिक्षण क्षेत्रात अत्यंत गरजू समाज सदस्यांना मदत करण्याच्या उद्देशाने आमचा हा ग्रुप एकत्र आला आहे व आम्ही यां पुढे ही समाज कार्य करीत राहू असे मत विनोद म्हसकर यांनी व्यक्त केले. या प्रसंगी वासिंद गावातील समाज सेवक या कार्यक्रमासाठी उपस्थित होते व त्यांनीही आर्थिक सहकार्य केले.

# देवणीत महिलेने गायीच्या बछड्याचे केले बारसं!

**देवणी/प्रतिनिधी**



देवणी तालुक्यातील कोनाळी येथे अपत्य नसलेल्या विधवा महिलेच्या वतीने चक्क गायीच्या वासराचं बारसं घालून गायीसह वासराची भजन करीत वाजतगाजत गावातून मिरवणूक काढण्यात आली व तसेच नामकरण सोहळ्यासाठी गाव जेवण देवून आपल्याला अपत्य नसलेतरी काय झाले गायीचे वासरू आपल्या अपत्या प्रमाणेच आहे. म्हणून गाय व वासरू यांच्यावरील प्रेमापोटी असा आगळा-वेगळा नामकरण सोहळा साजरा करण्यात आला. कोनाळी येथे माहेरी वयोवृद्ध आईकडे राहात असलेल्या गौळणबाई यांचा विवाह औसा येथील लक्ष्मण सुर्यवंशी यांच्याशी चाळीस वर्षापूर्वी झाला होता. गौळणबाई यांच्या पतीचे सन १९८९ साली दुर्दैवी निधन झाले. तेव्हा पासून गौळणबाई ह्या माहेरी आईकडे राहून मोलमजुरी करून आपली उपजीविका भागवीत असत. पतीच्या निधनानंतर आपलं अख्खा आयुष्य वारकरी संप्रदायात झोकून घेतलेल्या गौळणबाई हे. पंढरपूर, आळंदी येथे वारी करण्यात आपला अधिकचा वेळ घालवीत असत. मात्र कोरोना काळात पंढरपूर व आळंदी येथे वारी बंद झाली. गौळणबाई यांनी कोनाळी येथे आपल्या गरिबीतून गाय विकत घेतली. गौळणबाई यांच्या समोर एकीकडे पतीच्या निधनानंतर मोठे संकट उभे राहीले होते. तर अपत्य नसल्याची खंत ही त्यांना भेडसावत होती. मात्र गायीच्या पालन पोषण करण्यात हळूहळू त्यांना गायीचा लळा लागला. गौळणबाईनीं गायीचे नाव कमला असे ठेवले. त्यानंतर आता गायीला दि. २६ मे रोजी वासरू झाले असून त्याचा सोमवारी नामकरण सोहळा ठेवण्यात आला. त्याचे नाव पाळणा घालून कान्हा ठेवण्यात आले. गौळणबाई हे वासराशी लळा लागल्याने आनंदून जावून मुलाप्रमाणे बारसे साजरे करण्यासाठी वारकरी मंडळ बोलावून भजन करीत वाजत गाजत गावातून मिरवणूक काढून मारोतीला प्रदक्षिणा घातल्या व महिला भगिनींना सोबत घेऊन आपल्या वासराचा पाळणा घातला व नामकरण सोहळ्यासाठी गाव जेवणही दिले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी चंद्रकला शिवाजी पोलकर, गौतम माने यांच्यासह आदींनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात वृत्तांत

### लक्ष्मीबाई ढेंकरे विद्यालयाची परंपरा कायम

औसा : औसा तालुक्यातील फत्तेपुर येथील श्रीमती लक्ष्मीबाई ढेंकरे विद्यालय महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने २०२२ मार्च मध्ये घेतलेल्या परीक्षेमध्ये या विद्यालयाने उज्वल यशाची परंपरा कायम राखून घवघवीत यश संपादन केले आहे. शाळेचा यावर्षी ९७ टक्के निकाल लागला असून या वर्षी एकूण १३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातून सर्व प्रथम कुमारी साक्षी अवदुंबर दळवे ९४.८०% सर्व द्वितीय कुमारी गायत्री दत्तात्रय तौर ९३ . ६० % सर्व तृतीय कुमारी निकेता गणेश मोगरगे ९३.०० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाले.तसेच ९०% पेक्षा जास्त गुण घेणारे विद्यार्थी ११ असुन विशेष प्राविण्यासह ७८ प्रथम श्रेणी ४१ द्वितीय श्रेणी १४ असे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या उज्वल यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सचिव संचालक मंडळ मुख्याध्यापक मुळे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

### कोकण विभागात सरासरी १.६ मिमी पावसाची नोंद

नवी मुंबई : कोकण विभागात दि.१५ जून २०२२ रोजी सरासरी १.६ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक पावसाची नोंद रत्नागिरी जिल्हयात ४.४मि.मी. झाली आहे. कोकण विभागात आत्तापर्यंत एकूण ७६.६ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. जिल्हा निहाय पावसाची आकडेवारी पुढील प्रमाणे ठाणे-०.० मि.मी.,पालघर-०.८मि.मी, रायगड-०.१ मि.मी., रत्नागिरी-४.४ मि.मी., सिंधुदुर्ग-१.०मि.मी.

### श्री रामनाथ माध्य.विद्यालयाचा निकाल ९९ टक्के

औसा : तालूक्यातील श्री रामनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आलमला ता. औसा या विद्यालयाचा सन २०२१- २२ मध्ये घेतलेल्या एस.एस.सी.बोर्ड परीक्षेचा निकाल ९९ टक्के लागला असून या विद्यालयाने यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. या परीक्षेसाठी विद्यालयातून ७९ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी ३९ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य श्रेणी प्राप्त केली तर ३१ विद्यार्थी प्रथम श्रेणीत व ७ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. त्यात विद्यालयातून बिराजदार मेघना ही ९१.२०% गुण घेऊन विद्यालयातून प्रथम आली. कु, बिरादार अंकिता ९०.४०%( द्वितीय), बिराजदार मानसी ८९.८०% व कुंभार सृष्टी ८९.६०% गुण घेऊन विद्यालयातून तृतीय आल्या आहेत. यशस्वी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे संस्थेचे पदाधिकारी व सर्व संचालक मंडळ, तसेच मुख्याध्यापिका अनिता पाटील, पर्यवेक्षक आवटे ए.आय.व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

### श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचा निकाल १०० टक्के

लातूर : येथील अभिनव मानव विकास संस्थाद्वारा संचालित श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचा इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला असून विद्यालयातील सर्वच्या सर्व विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. या विद्यालयातील कु. मनस्वी विष्णू पौळकर, लक्ष्मण प्रकाशराव कदम आणि सुशिल शिवानंद चिल्लरगे या तीन विद्यार्थ्यांनी १०० टक्के गुण मिळवून विद्यालयातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे. या विद्यालयातून एकूण १४६ विद्यार्थी दहावी परीक्षेला त्यापैकी सगळेच्या सगळे विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहे. विद्यालयाच्या एकूण विद्यार्थ्यांपैकी ११० विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवले आहेत. तर ३६ विद्यार्थ्यांनी ७५ ते ८९. ९ टक्के गुण मिळवले आहेत. विद्यालयातील सर्व गुणवंतांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, कोषाध्यक्ष जयेश बजाज, अतुल देऊळगावकर यांसह मुख्याध्यापक रमाकांत स्वामी, पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी यांनी हार्दिक अभिनंदन केले आहे.

### यशवंत विद्यालयाचे नेत्रदीपक यश

अहमदपूर : सन २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परिक्षेत यशवंत विद्यालयाच्या सहा विद्यार्थ्यांनी शंभर पैकी शंभर टक्के गुण संपादन केले असून यशाची नेत्रदीपक परंपरा कायम केले आहे. या विद्यालयातून ६५४ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी ६५० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाळेतून ९० %च्या पुढचे विद्यार्थी १७१आहेत. त्यात विशेष प्रावीण्यासह ४०७, प्रथम श्रेणी १७२, द्वितीय श्रेणी ६९, तृतीय श्रेणी ०२, असून शाळेचा शेकडा निकाल ९९.३८ असा विक्रमी लागला आहे. शंभर टक्के गुण घेणारे विद्यार्थी मानसी भाऊसाहेब पवार, शिवम वैजनाथ पौळ, कौस्तुभ ज्ञानोबा ईप्पर, संस्कार घनश्याम स्वामी, अथर्व शिवानंद भारती, प्रसाद ज्ञानदेव केंद्रे आहेत. या गुणवंताचा सत्कार विद्यालयाचे मुख्याध्यापक व्ही.व्ही. गंपले यांच्या हस्ते करण्यात आला. या नेत्रदीपक यशाबद्दल टागोर शिक्षण समितीचे सचिव शिक्षण महर्षी डी बी लोहारे गुरुजी, मुख्याध्यापक व्ही.व्ही.गंपले, उपमुख्याध्यापक रमाकांत कोंडलवाडे, पर्यवेक्षक दिलीप गुळवे, उमाकांत नरडेले यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

### राजमाता जिजामाता विद्यालयाचा निकाल ९२ टक्के

लातूर : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर करण्यात आला आहे. यात येथील राजमाता जिजामाता विद्यालयाने आपली उज्ज्वल यशाची यशस्वी परंपरा कायम राखली असून या विद्यालयाचा निकाल ९२ टक्के लागला आहे. या परीक्षेत राजमाता जिजामाता विद्यालयातील जितेश विष्णू लामतुरे हा ९३ टक्के गुण मिळवत विद्यालयात प्रथम, अल्फिया अब्दुल रजाक गिड्डे ही ९२ टक्के गुण मिळवत द्वितीय तर सुदर्शन हनुमान शिंदे याने ९१.६० टक्के गुण मिळवत विद्यालयात तृतीय आला आहे. या विद्यालयातील २६ विद्यार्थ्यांनी ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविले असून ३० विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. तसेच तुळजाभवानी माध्यमिक विद्यालयातील अविनाश संजय राठोड हा ९१.४० टक्के गुण घेऊन विद्यालयात प्रथम, क्षितीजा श्रीराम जाधव ही ८६.६० टक्के गुण मिळवत द्वितीय तर सुमित सुधाकर कस्तुरे हा ८१.४० टक्के गुण मिळवत विद्यालयात तृतीय आला आहे. या विद्यालयातील ११ विद्यार्थ्यांनी ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविले असून २२ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे आदींनी कौतुक केले.

# तरुणाईच्या प्रक्षोभाचा अग्नीपथ!

या देशातील तरुण हा या देशाचे भवितव्य आहे. त्यामुळे या तरुण वर्गाला चांगल्या चांगल्या मार्गाला लावणे त्याला आर्थिक दृष्ट्या सक्षम करून त्याला एक चांगला कुटुंब करता बनवणे आणि त्याला त्याच्या जबाबदारीची जाणिव करुन देणे ही काळाची गरज आहे आणि त्यासाठी तरुणाईला रोजगार उपलब्ध करून देणे हे सरकारचे कर्तव्य आहे. पण रोजगार उपलब्ध करून देताना त्या रोजगारात त्याच्या संपूर्ण आयुष्यातील सर्व गरजा भागविण्याची तरतूद असायला हवी, पण तसे न करता त्याला दोन-चार वर्षांसाठी तात्पुरता रोजगार उपलब्ध करून देणे म्हणजे तरुणाईची थट्टा आहे. अगोदरच पदवीपर्यंतचे शिक्षण घेऊनही रोजगार मिळत नसल्याने तरुण वर्ग निराश आहे. त्यात त्याला लष्करा सारख्या महत्वाच्या सुरक्षा क्षेत्रात अवघ्या ४ वर्षांसाठी नोकरी देण्याचा सरकारी प्रस्ताव कसा काय त्याच्या पचनी पडेल. मोदींना कोणी म्हटले की तुम्ही दोनच वर्षांसाठी पंतप्रधान पदावर रहा तर ते मान्य करतील का? मग तरुणांना ४ वर्षांची नोकरी कशी काय देता हा अग्निपथ भाजपला भारी पडणार आहे. भारतात पूर्वी राजा महाराजांचे शासन असायचे. त्यामुळे राजा ठरवेल ते धोरण आणि बांधील ते तोरण अशी परिस्थिती होती. आता राजेशाही जाऊन लोकशाही आली आहे. पण ती नावाला आहे. कारण या लोकशाहीचा कारभार राजेशाही पेक्षाही वाईट आहे. पूर्वी राजाची मनमानी असायची आता पंतप्रधान महाराजांची मनमानी आहे. पूर्वी राजाच्या कमरेला तलवार असायची आता पंतप्रधान महाराजांच्या कनवटीला राक्षसी बहुमत आहे. त्यामुळे राजला जसे कोणाला अडवयची हिम्मत नव्हती, तशाच प्रकारे आता पंतप्रधान महाराजांना अडवायची कोणाची हिम्मत नाही. म्हणूनच तर ना खाता ना वही मोदी कहे वोह ही सही असा देशाचा कारभार सुरू आहे आणि जबरदस्तीने लादलेली नोट बंदी, शेतकरी कायदे, जीएसटी ही त्याचीच उदाहरणे आहेत आणि आता अग्निपथ नावाची अशीच एक योजना लादण्याचा केंद्राने घाट घातला आहे. मात्र ही योजना तरुणाच्या भवितव्याशी खेळणारी असल्याने या योजनेच्या विरोधात तरुण रस्त्यावर उतरलेत त्यांनी जाळपोळ सुरू केली आहे. आता केंद्राचे गुलाम असलेले इलेक्ट्रॉनिक मीडियावाले या आंदोलनकर्त्यांना दहशतवादी किंवा पाकिस्तानचे हस्तक ठरवतील जसे शेतकरी आंदोलकांना खलिस्तानी ठरवले तसेच अग्निपथच्या विरोधकांना पाकिस्तानी ठरवले जाईल, पण लोकांचा आवाज किती दाबणार? कधीना कधी तुम्हाला सतेतून जावेच लागेल. या देशातला तरुण अगोदरच बेरोजगारीच्या वणव्यात होरपळत असताना त्याला रोजगार देण्याच्या नावाखाली जर कोणी त्याची फसवणूक करीत असेल तर या देशतील युवा शक्ती गप्प बसणार नाही. अग्निपथ योजना बकवास आणि बेरोजगारांच्या जखमेवर मीठ चोळणारी आहे. लष्कर भरतीत वयोमर्यादा कमी करून तरुणांना लष्करात भरती करायचे त्यांना खडतर ट्रेनिंग द्यायची आणि चार वर्षांनी त्यातील ७५ टक्के तरुणांना निवृत्त करायचे. त्यासाठी त्यांना साडेअकरा लाख द्यायचे, तर केवळ २५ टक्के तरुणांनाच कायम करायचे अशी ही योजना आहे. पण चार वर्ष लष्करात रोजगार देऊन नंतर ज्या ७५ टक्के तरुणांना निवृत्त केले जाणार त्यांनी पुढे जगायचे कसे सरकार त्यांना निवृत्त करताना जे साडे अकरा लाख रुपये देणार आहे. त्यात त्यांना संपूर्ण आयुष्यभर जगता येईल का? मग कशासाठी हा खटाटोप? केंद्रात बहुमत आहे म्हणून काहीही करायचे याला काय अर्थ आहे का? आजवर सामान्य माणसाच्या आयुष्याशी खेळत होता. आता तरुणांच्या भविताव्याशी खेळ खेळला जातोय आणि त्याविरुद्ध देशभरातील तरुण रस्त्यावर उतरला आहे. परिणामी देशात स्फोटक वातावरण तयार झालेले आहे. अगोदर मुस्लिमांच्या प्रार्थनास्थळांवर हक्क सांगितल्यावरून देशात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर भाजप प्रवक्त्या नुपूर शर्मा यांच्या वादग्रस्त वक्तव्यावरून तोडफोड झाली, लोक रस्त्यावर उतरले आणि आता सरकारने तरुणांची माथी भडकावणारा अग्निपथ तयार केलाय. त्यामुळे या देशात शांततेने जगणाऱ्या लोकांची अक्षरशः कोंडी झाली आहे. या देशातील प्रत्येक तरुणाच्या हाताला काम मिळायला हवे. देशाच्या विकासाच्या प्रक्रियेत या देशातील प्रत्येक तरुणांचा सहभाग असायला हवा, तरच या देशाचा विकास होईल. मोदीची भाषणे आणि राष्ट्रभक्तीचे उपदेश ऐकून या देशातील युवा पिढीचे पोट भरणार नाही. या देशात परदेशी गुंतवणूक यायला हवी आणि त्यातून रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हायला हव्यात. देशातील लष्करासारखे जे सार्वजनिक उपक्रम आहेत तिथे काम करण्यास देशाच्या सीमांचे रक्षण करण्यास या देशातील प्रत्येक तरुण उत्सुक आहे. पण लष्करातील रोजगार हा तात्पुरता नसावा एवढीच त्यांची अपेक्षा आहे. लष्करातीलच नव्हे तर इथल्या सार्वजनिक आणि खाजगी उपक्रमांमध्ये जे रोजगार उपलब्ध करून दिले जातील ते तात्पुत्या स्वरूपाचे नसावेत हीच या देशातील तरुणांची इच्छा आहे. दुर्दैवाने आपल्या राज्यकर्त्यांना नेमके हेच कळलेले नाही. त्यामुळे त्यांची भूमिका हि देशातील सर्व १३० कोटी जनतेची भूमिका आहे असे त्यांना वाटते आणि म्हणूनच ते अग्निपथ सारख्या योजना लोकांवर लादण्याचा प्रयत्न करतात, पण लोक आता या गोष्टी खपवून घेणार नाहीत.

# दहशतवादाला बळ देणारे, ग्रेट रिप्लेसमेंट काय आहे?

## दिशायन



न्यू यॉर्क राज्यातल्या बफेलो या शहरातल्या एका सुपरमार्केटमध्ये नुकताच एका व्यक्तीने बेछूट गोळीबार केला. त्यात १० लोक मारले गेले आणि तीन गंभीररीत्या जखमी झाले. हल्लेखोर पायटॉन गेन्ड्रॉन हा १८ वर्षाचा श्वेतवर्णीय तरुण होता. इथे वर्णाचा उल्लेख मुद्दामहून करण्यामागचे कारण म्हणजे त्याने हे कृत्य श्वेतवर्णीय श्रेष्ठता आणि वर्चस्वामधूनच केले होते. ज्याला व्हाईट सुप्रिमसी' म्हणतात. या तरुणाने हल्ल्याच्या आधी १८० पानांचा वांशिकतेवर जाहीरनामा लिहून तो प्रसिद्ध केला होता. ज्यात त्याने तथाकथित वर्णद्वेषी सिद्धांतावरच भर दिला होता. त्यामधून त्याचा इतर वंश विशेषतः कृष्णवर्णीयांबद्दल असलेला तिरस्कार स्पष्ट होतो. हल्ला झालेल्या एकूण १३ लोकांपैकी ११ लोक हे कृष्णवर्णीय होते. ज्या सुपरमार्केटमधे हा हल्ला झाला त्या परिसरात कृष्णवर्णीय समुदाय मोठ्या प्रमाणात राहात असल्यामुळे साहजिकच त्यांचे त्याठिकाणी जास्त येणे-जाणे होते. आरोपीने ते हेरले होते. तो त्या शहरातला रहिवासी नव्हता, दोनशे मैलांवरून येऊन त्याने अशा निर्दयी हत्या केल्या आणि पुन्हा अमेरिकेतला वंशभेद चव्हाट्यावर आला. अटर्नी जनरल मेरिक यांनी या हल्ल्याला तिरस्कारातून आणि वर्णभेदातून प्रवृत्त होऊन केलेला हिंसाचार असे म्हटले.

### वर्ण, वंशाबद्दलची अढी

श्वेतवर्णीय लोक हे सर्व वर्णात, वंशात श्रेष्ठ आहेत त्यामुळे त्यांनी बाकीच्या लोकांवर सत्ता गाजवली पाहिजे, असा एकंदर श्वेतवर्णीय वर्चस्वाचा सूर दिसून येतो. अमेरिकेत प्रामुख्याने दक्षिणेकडच्या राज्यात १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत गुलाम ठेवायला कुणाचीही मनाई नव्हती तर जिम क्रो' यासारख्या कायद्याने वांशिक भेदाला सरळ-सरळ मान्यता दिली होती. त्यावेळच्या कितीतरी राष्ट्राध्यक्षांच्याकडे गुलाम होते. त्यामुळे याला आपोआपच राजकीय पाठिंबा मिळत गेला आणि श्वेतवर्णीय वर्चस्व आणखीनच प्रबळ झाले. १८६५ला गुलामगिरीला कायद्याने बंदी घालण्यात आली, पण ती कागदोपत्रीच राहिली. श्वेतवर्णीयांनी गुलाम ठेवले नाही, मात्र इतर वर्ण, वंशाबद्दलची अढी त्यांच्या मनातून गेली नाही, ती तशीच राहिली. त्याला खतपाणी घालण्याचे काम राजकारण्यांनी केले. त्यामुळे तो द्वेष तसाच धगधगत राहिला.

### जहाल विचारांचा अतिरेक

निवडणुका आल्या की सत्ता काबीज करण्यासाठी हे असले वंश, वर्ण, जात, धर्म, विचारसरणी यावर आधारलेलं ब्रम्हास्त्र बाहेर काढले जाते. त्याला कोणत्याही देशाचे राजकारण अपवाद नाही. जगात सगळीकडे कमी जास्त प्रमाणात हे सुरूच आहे. आपण एकविसाव्या शतकात असून मानवाने प्रत्येक क्षेत्रात प्रगती केली आहे, करत आहे. पण या अशा दांभिकतेमुळे या त्याच्या प्रगतीवर, बुद्धीची शंका यायला लागते. आज राजकारणी, समाजविघातक माणसे लोकांच्या भावनेला हात घालणारे एक एक मुद्दे उकरून काढत आहेत आणि लोक डोळे झाकून त्यावर विश्वास ठेवत आहेत. त्यांना विरोध केला तर एकमेकांना पाण्यात बघत आहेत, हल्ले करत आहेत. कोणालाही वाढती महागाई, विस्कटलेली अर्थव्यवस्था, जागतिक महामारी, वातावरणात होणारे बदल ज्याला सर्वस्वी मानव जबाबदार आहे आणि त्यामुळे पृथ्वीवर येणारे भावी काळातले संकट याचे काही घेणंदेणं नाही. अँटी-डीफेमशन लीगच्या सर्व्हेनुसार गेल्या दशकात अमेरिकेत या अशाच राजकीय पक्षांच्या जहाल विचारांच्या अतिरेकीपणामुळे ४५० लोकांना आपले प्राण गमवावे लागले. यासाठी उजव्या विचारसरणीचे ७५ टक्के तर इस्लामिक अतिरेकी २० टक्के आणि डाव्या विचारसरणीचे ४ टक्के जबाबदार आहेत. त्यातले अर्धे लोक हे श्वेतवर्णीय वर्चस्वाचे बळी ठरलेत.

### उजवा राजकीय गट सक्रीय

एकूणच आकडेवारीवरुन, डाव्या विचारसरणीपेक्षा उजवा राजकीय गट हिंसाचाराला प्रोत्साहन देतो असे दिसून येते. हा उजवा विचारसरणीचा गट म्हणजे रिपब्लिकन पक्ष. हे कट्टरतावादी हत्येसोबत इतरही अनेक बेकायदेशीर मार्ग पत्करून हिंसा पसरवतात. त्याचे उत्तम आणि अलीकडचे उदाहरण म्हणजे ६ जानेवारी २०२१ रोजी अमेरिकेच्या संसदेवर स्वकीयांनीच केलेला हल्ला होय. नेत्यांची चेतावणीची भाषाच या त्यांच्या अनुयायांना असे कृत्य करण्यास प्रोत्साहन देत असते. त्यात ट्रम्प यांचा नंबर सर्वात आधी लागतो. याशिवाय पुरातनमतवादी माध्यमे जी अशा बेकायदेशीर, हिंसाचाराला राजकीय पक्षप्रेम, पक्षाचा अजेंडा, देशप्रेम अशी गोंडस नावे देऊन त्याचे समर्थन करतात. बरेच उजव्या विचारसरणीचे राजकीय नेते ही अशी चेतावणीची भाषा वापरत नाहीत, पण पक्षातले जे वापरतात त्यांना अडवतही नाहीत.

### ग्रेट रिप्लेसमेंट थिएरी

या श्वेतवर्णीयांच्या वर्चस्ववादी विचारधारेत ग्रेट रिप्लेसमेंट थिएरी' म्हणजे महान बदल ही संकल्पना मोठ्याप्रमाणात रुजू होताना दिसत आहे. श्वेतवर्णीय समुदायाची जागा, त्यांचे हक्क, महत्त्व, संधी हे स्थलांतरित लोक बळकावत आहेत अशा निराधार तत्त्वावर ही ग्रेट संकल्पना आधारलेली आहे. त्यातूनच इतर वंश, वर्णाच्या लोकांच्याप्रती द्वेष मनात धरून हल्ले करण्याचे प्रमाण वाढले आहे आणि या संकल्पनेवर अगणित अमेरिकन लोक विश्वास ठेवतात ही गोष्ट जास्त धक्कादायक आहे. 'द असोसिएटेड प्रेस अँड नॉर्क सेंटर फॉर पब्लिक अफेयर्स रिसर्च' यांनी डिसेंबरमध्ये घेतलेल्या सर्व्हेनुसार, अमेरिकेत जन्मलेल्या लोकांना जाणूनबुजून डावलून त्यांची जागा स्थलांतरितांना दिली जात आहे, असा विश्वास एक तृतीयांश अमेरिकन प्रौढांना वाटतो. तर जसजसे बाहेरचे लोक अमेरिकेत येत आहेत तसतसा मूळच्या अमेरिकन लोकांचा आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक प्रभाव कमी होत जाण्याची भीती २९ टक्के लोक बाळगतात. यामध्ये रिपब्लिकन लोक जास्त आहेत. मॅसच्युसट्स युनिवर्सिटीच्या सर्वेनुसार, दोन तृतीयांश रिपब्लिकन लोकांना असे वाटते की 'स्थलांतरितांची संख्या वाढणे म्हणजे अमेरिकेची संस्कृती आणि ओळखीवर त्याचा घातक परिणाम होणे'. तसेच राजकीय सत्ता ही या बाहेरून आलेल्यांच्या आणि अल्पसंख्याकांच्या हातात जात आहे, असा गवगवा या श्वेतवर्णीय समुदायाकडून करण्यात येतो. त्यातूनच 'पुन्हा एकदा अमेरिकेला महान बनवूया' सारख्या घोषणा ऐकायला मिळतात. आपणच देशाचे, समाजाचे हितचिंतक असून आपला हक्क, आपले स्थान सरळपणे नाही मिळाले तर हल्ला करून, हिंसाचाराच्या मार्गाने मिळवू अशी शिकवण ग्रेट रिप्लेसमेंट सारख्या तथाकथित संकल्पनेतून रुजवली जात आहे.

### ग्रेट संकल्पनेतून हल्ले

या संकल्पनेचे मूळ युरोपमध्ये सापडते. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला फ्रेंच राष्ट्रवादाचा जनक मॉरीअस बर्रेस याने ज्यू लोक आपल्यावर सत्ता गाजवतील आणि आपली मातृभूमी नष्ट करतील असे म्हटले होते. अशाच प्रकारची संकल्पना जर्मनीमध्ये नाझी लोकांनी राबवली होती. ख्रिश्चन धर्मीय आणि ज्यू लोकांचे पहिल्यापासूनच वैर आहे. ज्यू लोकांची अमेरिकेतली वाढती संख्या त्यांना धोकादायक वाटू लागली त्यातूनच त्यांना विरोध करण्यासाठी ग्रेट रिप्लेसमेंट संकल्पना उदयाला आली. हळूहळू कृष्णवर्णीय, इतर वंशाचे, अल्पसंख्याक असे सगळेच त्यांना आपले विरोधक वाटू लागले. २०१७ साली श्वेतवर्णीय समुदायाने व्हर्जिनिया युनिवर्सिटीमध्ये ज्यू लोक किंवा इतर कुणीही आमची जागा घेऊ शकणार नाही' असे म्हणत मोर्चा काढला. २०१९ साली न्यूझीलंडमध्ये दोन मशिदींवर हल्ला करून ५१ जणांचे बळी एका श्वेतवर्णीय व्यक्तीने घेतले होते. त्याने मुस्लिमांची आपल्या देशातली वाढती संख्या बघून या ग्रेट संकल्पनेतूनच तो हल्ला केला होता. बफेलो हल्ल्याचा हल्लेखोर या व्यक्तीपासून प्रभावित झाला होता. त्याने कृष्णवर्णीय लोकांना शक्य होईल तेवढं लवकर हा देश सोडून जा, नाहीतर तुमची खैर नाही अशी धमकी दिली होती.

२०१२ साली विस्कॉन्सिन इथल्या गुरुद्वारावर हल्ला झाला होता त्यात सहा शीखांचे बळी गेले. २०१५ साली साऊथ कॅरोलिना इथल्या हल्ल्यात ९, तर २०१९ला टेक्सास मधल्या वॉलमार्ट या सुपरमार्केटमध्ये २३ लोकांना या श्वेतवर्णीयांच्या तिरस्कारामुळे आपले प्राण गमवावे लागले. याच द्वेष भावनेतून दोन वर्षांपूर्वी एका पोलीस अधिकाऱ्याने जॉर्ज फ्लॉइड या कृष्णवर्णीय व्यक्तीचा क्षुल्लक अपराधासाठी त्याच्या मानेवर आपला गुडघा दाबून जीव घेतला होता. त्या प्रकरणानंतर केवळ अमेरिका नाहीतर पूर्ण जग पेटले. लोकांनी या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. पण ते तेवढ्यापुरतेच, पुन्हा तेच हल्ले!

### व्हाईट सुप्रिमसीचे विष

अमेरिकेच्या गृहखात्याने श्वेतवर्णीय वर्चस्व हा देशासाठी सर्वात मोठा प्राणघातक धोका असल्याचं म्हंटलंय. आपल्या शपथविधी वेळच्या अध्यक्षीय भाषणात श्वेतवर्णीय प्राबल्याचा' उच्चार करणारे बायडेन हे पहिले राष्ट्राध्यक्ष ठरले. त्याआधीच्या राष्ट्राध्यक्षांनी वंशभेदावर भाष्य केले होते पण थेट पांढऱ्या वर्चस्वाबद्दल कोणी बोलले नव्हते. बफेलो हल्ल्याच्या ठिकाणी भेट देऊन व्हाईट सुप्रिमसी हे वीष असून राजकारण्यांमध्ये भिनले असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. जर असे हल्ले मुस्लिम किंवा इतर वंशाच्या, धर्माच्या लोकांनी केले असते तर याच अमेरिकन लोकांनी त्यांना देश सोडून जायला भाग पाडले असते. पण आपलेच दात आणि आपलेच ओठ म्हटल्यावर कोण कोणाला आळा घालणार? वंश श्रेष्ठतेच्या नावाखाली आणखी किती आणि कोणत्या वंशाच्या निष्पाप लोकांचे बळी जाणार काय माहिती?

अमेरिकेत सहजरित्या बंदुका, रायफली उपलब्ध होत असल्यामुळे असे हल्ले करण्यासाठी फार खटपट करावी लागत नाही. बफेलो हल्ल्याला एक आठवडा झाला असतानाच टेक्सास इथल्या प्राथमिक शाळेत एका १८ वर्षीय माथेफिरूने बेछूट गोळीबार करत १८ मुले आणि २ मोठ्या व्यक्तींचा जीव घेतला. स्व:रक्षण या नावाखाली मिळणाऱ्या बंदुका आणि त्याचे परवाने याचा वापर ग्रेट रिप्लेसमेंट सारख्या संकल्पनेतून, मानसिक आजारातून, थ्रिल म्हणून निष्पाप लोकांना मारण्यासाठी केला जात आहे.

स्वतःला महासत्ता म्हणवून घेणाऱ्या अमेरिकेला हिंसाचारावर नियंत्रण ठेवता येत नाही. कारण त्यापाठीमागे ही राजकीय स्वार्थ आहे. बंदुकीचा परवाना काढून घेणे दोन्ही ही पक्षाला जमत नाही. त्याचा परिणाम थेट मतांवर होईल म्हणून कोणी धजावत नाही. जगातल्या दहशतवादाला, हिंसाचाराला आळा घालून लष्कराच्या भाकऱ्या भाजण्यापेक्षा अमेरिकेने आधी स्वतःच्या घराला सावरण्याची गरज जास्त आहे, नाहीतर दहशतवादी राष्ट्रांच्या यादीत नाव यायला वेळ लागणार नाही.

# पावसाळा आणि आपत्ती व्यवस्थापन



पावसाळा सुरु झाला आणि पावसाने जोर धरला की विविध ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटना घडतात. पावसाळयात दरडी कोसळण्याचे मुख्य कारण म्हणजे, उन्हाळ्यात डोंगरकड्यांवरील खडक तापतात आणि सैल होतात. पावसाळ्यात खडकाला पडलेल्या भेगांमधून त्याची रुंदावण्याची प्रक्रिया सुरू होते. जोराचा पाऊस पडल्यावर दगड उताराच्या दिशेने कोसळतात. घाट रस्ते हे तीव्र उताराचे डोंगर उभे कापून केलेले असतात. तसेच, पर्वतात बोगदे खणल्यामुळे, डोंगर उतारांवर शेतीसाठी, शेततळ्यांसाठी, घरे बांधण्यासाठी सपाटीकरणामुळे, चर खणल्यामुळे तसेच जंगलतोडीमुळे डोंगरउतार धोकादायक होऊ लागतात. अशा मानवी अतिक्रमणामुळे अतिवृष्टीदरम्यान दरडी कोसळतात. दर वर्षी पावसाळ्यात दरडी कोसळण्याचे प्रमाण वाढत आहे. गेल्या वर्षी जुलैमध्ये राज्यात दरडी कोसळण्याच्या घटना घडल्या होत्या. त्यात दीडशेहून अधिक नागरिकांना प्राण गमवावा लागला. प्रतिकूल पर्यावरण, अतिवृष्टी आणि भूकंपप्रवणता या नैसर्गिक कारणांबरोबरच डोंगरउतारांवर मोठ्या प्रमाणात होणाऱ्या मानवी अतिक्रमणांमुळे समतोल ढळतो. क्रिया बल व प्रतिक्रिया बल यांची परिमाणे समान असतात. परंतु, त्यांच्या दिशा परस्परविरोधी असतात, हा न्यूटन या शास्त्रज्ञाचा गतीसंबंधीचा तिसरा नियम आहे. डोंगर उतार असमतोल करणारे मानवी अतिक्रमण ही झाली क्रिया आणि त्यामुळे समतोल ढळून दरडी कोसळणे ही निसर्गाची प्रतिक्रिया हे लक्षात घ्या. निसर्गात आपण केलेले बदल म्हणजे 'कुऱ्हाडीचा दांडा, गोतास काळ' हे विसरुन चालणार नाही. पावसाळ्यात पुराच्या पाण्यामुळे कोकणातील चिपळूण आणि महाड हे दोन शहरं संपूर्ण पाण्याखाली गेली होती. त्यातच दरड कोसळल्यामुळे अनेकांचा मृत्यू झाला. पण, यामागे नेमकी काय कारणं आहेत? दरड का कोसळते, दरड कोसळण्यापूर्वी निसर्गाकडून काही पूर्वसूचना मिळतात का, मानवनिर्मित कारणांमुळेही दरड कोसळते का, दुर्गम भागात, डोंगराच्या पायथ्याशी राहणाऱ्या लोकांनी पावसाळ्यात काय काळजी घेतली पाहिजे, या सगळ्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी 'न्यूटन जागवा; दरडी थोपवा' या अभियानांतर्गत पर्यावरण दिनापासून (५ जून) संपूर्ण राज्यात विशेष उपक्रम राबविले जात आहे. ज्येष्ठ भूगर्भ अभ्यासक आणि राज्याच्या भूस्खलन निवारण समितीचे सदस्य डॉ. सतीश ठिगळे यांच्या पुढाकाराने 'न्यूटन जागवा; दरडी थोपवा' अभियान राबविले जात आहे. डॉ. ठिगळे यांनी गेल्या वर्षी दरडी कोसळलेल्या प्रत्येक ठिकाणची पाहणी केली. नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी ठिगळे यांनी 'ट्रेन द ट्रेनर', बिनभिंतीची कार्यशाळा आणि 'न्यूटन जागवा; दरडी थोपवा' या पुस्तकांच्या माध्यमातून विशेष प्रयत्न केले आहेत. नुकतेच श्री. ठिगळे यांनी दरडींबाबतची संपूर्ण शास्त्रोक्त माहिती देणारे पत्रक प्रसारित केले आहे. १९८९ साली भाजे येथे ३८, २००५ साली महाड परिसरात कोडीवते, रोहन, दासगाव, जुई, येथे १९८, २०१४ साली माळीण येथे १५०, तर अलीकडे २०२१ मध्ये तळीये, पोसरे, ढोकावळे, आंबेघर, मिरगाव या ठिकाणी दरडी कोसळून १३० व्यक्ती ठार झाल्या. या सर्व घटना घडण्यापूर्वी निसर्गाने काही न काही धोक्याच्या पूर्वसुचना दिल्या असणारच पण त्या सुचना ओळखता न आल्याने या दूरघटना घडल्या.

दरडींची लक्षणे : १. डोंगर उतारांना तडे जाणे व तडे गेलेला भाग खचू लागणे, घरांच्या भिंतींना भेगा पडून पडझड होणे, झाडे, विद्युत खांब, कुंपणे कलणे. २. नवीन झरे निर्माण होणे, जुने झरे रुंदावणे, त्यांच्यातून मोठ्या प्रमाणात गढूळ पाणी बाहेर येणे. ३. विहिरींतल्या भूजल पातळीमध्ये अचानक वाढ किंवा घट होणे. ४. अतिवृष्टी होत असताना झऱ्यांची पाणी देण्याची क्षमता अचानक वाढते. त्यांतून गढूळ पाणी येणे. ५.झाडे उमळून पडतात, तारांची कुंपणे, विद्युत खांब उचकटतात. ६.भात खाचरांना भेगा पडणे, जमिनीला हादरे बसणे.

डोंगरभागात राहणाऱ्या नागरिकांना ही लक्षणे त्वरीत ओळखता आली पाहिजेत, परिस्थितीचा अंदाज घेऊन त्या जागेवरुन तत्काळ स्थलांतर केले पाहिजे. धोक्यापासून तत्काळ दूर होऊन जीव वाचवला पाहिजे. पिढ्यान् पिढ्या नांदत असलेल्या घरापासून दूर कसे जायचे, पावसाळ्यात असं घडणारच, होईल थोड्या वेळात पूर्ववत, असे विचार झटकून टाकून प्रश्न फक्त स्वत:चा नाही तर आपल्या संपूर्ण कुटुंबाचा, पुढील पिढीच्या जीवन-मरणाचा आहे हे लक्षात घेऊन सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्यासाठी सज्ज झाले पाहिजे. पूर्वतयारी म्हणून बँकेची कागदपत्रे, सोने-नाणे, पैसाआडका, औषधे यांची जुळवाजुळव करून ठेवावी. प्रथम वृद्ध, आजारी माणसे, लहान मुले आणि जनावरांना हलवण्यास प्राधान्य द्यावे. अशा दुदैवी घटना घडू नये यासाठी काही आपल्या हातात असलेल्या गोष्टी केल्या तर निसर्गाच्या प्रकोपापासून आपण आपले आपल्या कुटुंबियांचे आणि प्राण्यांचेही जीव वाचवू शकतो. यासाठी बांबूची लागवड व वनीकरणास प्रोत्साहन देणे, भूजलाचा जलद निचरा करणे, संरक्षक भिंती आणि जाळ्या बसवणे. पावसाळ्यात डोंगर उतारांचे निरीक्षण करा शिक्षकांच्या मदतीने गावचे नकाशे प्राप्त करून डोंगर उतारावरील धोकदायक दरडींचे नकाशे तयार करणे,पूररेषा आखणे, गावाच्या पर्यावरणीय समस्यांबाबत पथनाट्य, पोवाडे, इत्यादींद्वारे जनजागृती घडवणे, धोकादायक परिसराचे व्हिडिओ चित्रीकरण करून पोलीस पाटील, तलाठी, ग्रामसेवक यांना पाठविणे. असे लहान सहान उपाय जरी आपल्या स्तरावर केले तरी आपण आपले व इतरांचे प्राण वाचवू शकतो. ज्या ज्या वेळी अशा घटणा घडल्या आहेत. त्या त्या वेळी शासनाने तत्काळ मदत पूरविली आहे. अशा संकटाच्या वेळी नेहमीच शासनाने नागरिकांना खंबीरपणे आधार दिला आहे. शासनाने यासाठी आपत्ती व्यवस्थापनाबाबत विशेष काळजी घेतली आहे. शासनाच्या सर्व विभागांच्या समन्वयाने आपत्तीवर मात केली जाणार आहे. यासाठी नागरिकांनी देखील खबरदारी घेणे आवश्यक आहे.

**- प्रविण डोंगरदिवे, माहिती सहाय्यक विभागीय माहिती कार्यालय कोकण विभाग, नवी मुंबई**

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

20 TO 26 JUNE 2022 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 18/06/2022 10:26 PM Page 1



# 'क्रांती गाथा' हे आधुनिक तीर्थस्थळ म्हणून सर्वांना परिचित होईल-मुख्यमंत्री उद्धव ठाकरे



**मुंबई/प्रतिनिधी**

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करताना इतिहासाच्या पाऊलखुणा जपणारे 'क्रांती गाथा' हे भूमिगत दालन व जलभूषण सारखी नवीन वास्तू देशाला प्रेरणा देणारी ठरेल, असे उद्गार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काढले. राजभवन येथे 'क्रांती गाथा' भूमिगत दालन व राज्यपालांच्या 'जलभूषण' निवासस्थानाच्या उदघाटन पर कार्यक्रमानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बोलत होते. यावेळी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण, जलसंपदा मंत्री जयंत पाटील, राजशिष्टाचार मंत्री आदित्य ठाकरे, राज्यमंत्री कु.आदिती तटकरे, विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील सदस्य व इतर मान्यवर उपस्थित होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले, 'क्रांती गाथा' भूमिगत दालन व जलभूषण ही नवी वास्तू हे दोन्हीही देशासाठी प्रेरणादायी ठरणार आहे. राज्यपाल यांनी म्हटंल्याप्रमाणे 'राजभवन' हे लोकभवन म्हणून नावारूपास येईल.

आज आपण एका चांगल्या कार्यक्रमासाठी सर्वजण उपस्थित आहोत ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. यापूर्वीही मी अनेकदा राजभवनात आलो आहे. राजभवनाचे हे बदलले रूप निश्चितच सर्वांना प्रेरणा देणारे आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांचे शौर्य स्वातंत्र्यासाठी प्रेरणा देणारे आहे. देशाच्या स्वातंत्र्य चळवळीने अनेक देशांना प्रेरित केले. संत तुकाराम ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या महान व्यक्तींच्या विचारांनी घडलेल्या महाराष्ट्राचे देशाच्या विकासात मोठे योगदान आहे. मुंबई तर स्वप्नांचे शहर आहे. मात्र महाराष्ट्रात अशी अनेक शहरे आहेत जी २१ व्या शतकात देशाच्या विकासाची केंद्रे बनतील, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला. याच विचाराने एकीकडे मुंबईच्या पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण केले जात आहे आणि त्याच वेळी इतर शहरांमध्ये देखील आधुनिक सुविधांमध्ये वाढ केली जात आहे असे त्यांनी सांगितले. शिक्षण क्षेत्राला माझे आग्रहाचे सांगणे आहे की नव्या पिढीला आपला इतिहास माहिती झाला पाहिजे. आपण सहलीसाठी अनेक ठिकाणी मुलांना घेवून जातो मात्र अंदमान निकोबारचा तुरूंगही विद्यार्थ्यांना दाखविला जावा, जेणेकरून स्वातंत्र्यवीर सावरकरांचे बलिदान माहिती होईल. गेल्या ६० -७० वर्षापासून राजभवनच्या खाली बंकर होता पण कुणालाच माहीत नव्हते. आज या वास्तू निश्चित सर्वांना माहिती होतील असाही विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी व्यक्त केला.

**राजभवन हे लोकभवन बनेल : राज्यपाल**

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी म्हणाले, राजभवनात साकारलेले 'क्रांती गाथा' भूमिगत दालन व 'जलभूषण' निवासस्थान हे राज्याला प्रेरणा देणारे ठरेल. यावेळी राज्यपालांनी राज्यात शिक्षण क्षेत्रातही आपण नविन उपक्रम राबवित असल्याचे यावेळी सांगितले. राजभवन हे लोकभवन म्हणून यापुढे सर्वांना परिचित होईल. राजभवन च्या माध्यमातून लोकांना महाराष्ट्र कळण्यास मदत होईल.

**'क्रांती गाथा' हे आधुनिक तीर्थस्थळ म्हणून सर्वांना परिचित होईल : मुख्यमंत्री**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले, स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करतांना क्रांती गाथा दालनाचे उदघाटन हा एक योगायोगच नाही तर एक चांगला मुहूर्त आहे. क्रांतीगाथा हे आधुनिक तीर्थस्थळ म्हणून सर्वांना परिचित होईल. 'दिव्यत्वाची जिथे प्रचिती तिथे कर माझे जुळती' असे म्हटले जाते. जे स्वातंत्र्य उपभोगतो आहोत त्यासाठी कितीजणांनी आपल्या घरादारावर निखारे ठेवले, किती जणांनी बलिदान दिले, कितीजणांनी मरण यातना सोसल्या, क्षणभर विचार केला हे असे घडले नसते तर आपण हे स्वातंत्र्य उपभोगू शकलो असतो का हा प्रश्न मनात येतो. आपल्याला स्वातंत्र्य असंच नाही मिळाले, ते कुणी आपल्याला आंदण नाही दिले हे स्वातंत्र्य आपल्याला लढून मिळवावे लागले आहे. तो इतिहास नुसता जतन नाही तर जिवंत करणे हे आपलं काम आहे. काळ पुढे जात आहे. आपण पारतंत्र्यात १५० वर्षे होतो आता स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली, पुढे जात असतांना हा वारसा पुढच्या पिढीला देण्याच काम केले नाही तर मला वाटते आपण आपल्या कर्तव्याला मुकतो आहोत. आज एक अप्रतिम काम आपण करत आहोत, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. मुख्यमंत्री पुढे म्हणाले, २०१६ ला हे भुयार सापडले. खंदक आणि भुयाराचा आज अप्रतिम उपयोग होतो आहे. तत्कालीन राज्यपाल विद्यासागर राव यांनी हे भुयार बघण्यास बोलावले होते. आता जी फिल्म बघितली त्यात याला तीर्थस्थळ म्हटले आहे. हे एक तीर्थस्थळच आहे. महाराष्ट्रदिनी आपण एक पुस्तक प्राथमिक स्वरूपात तयार केले आहे अजून ते पूर्ण व्हायचे आहे. माहिती गोळा होतेय. ज्ञात-अज्ञात क्रांतीकारकांचे ज्यांनी देशासाठी त्याग केला त्यांचे संकलन व्हायला पाहिजे म्हणून एक पुस्तक आपण तयार करत आहोत. नुसते बोलत बसण्यापेक्षा क्रांतीकारकांनी ज्या गोष्टी केल्या त्यांच्या त्यागाच्या एक कण जरी काम आपण करू शकलो तरी त्यांचे बलिदान कृतार्थ होईल, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. 'जलभूषण' या राज्यपालांच्या निवासस्थानाचे लोकार्पणही आज होत आहे. काळ बदलत असला तरी या परिसराने इतिहासाच्या पाऊलखुणा नेहमीच जपल्या आहेत. त्याला धक्का न लावता नुतनीकरण करणं, आधुनिक तंत्रज्ञानाने हे काम करणे खुप मोठी गोष्ट आहे. कलात्मक नजरेने याकडे पहातांना प्रत्येक ठिकाणी त्याचे सौंदर्य दिसते. इतक्या चांगल्याप्रकारे हे नुतनीकरणाचे काम करण्यात आले आहे. मला या दालनाच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित रहाता आले हा माझ्यासाठी सार्थकतेचा क्षण आहे, असेही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

**स्वातंत्र्य लढ्याच्या आठवणी जागवणारा ब्रिटिश कालीन बंकर**

'क्रांती गाथा' हे देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या अनेक ज्ञात व अज्ञात क्रांतिकारकांना समर्पित असलेले असे भूमिगत दालन आहे. देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून सन २०१६ साली राजभवन येथे सापडलेल्या ब्रिटिशकालीन बंकरमध्ये क्रांती गाथा' या दालनाची निर्मिती करण्यात आली आहे. इतिहासकार व लेखक डॉ विक्रम संपत यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नागपूर येथील दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्राच्या मदतीने 'क्रांती गाथा' दालन निर्माण करण्यात आले आहे. 'क्रांती गाथा' या दालनामध्ये १८५७ च्या पहिल्या स्वातंत्र्य लढ्यापासून १९४६ साली मुंबई येथे नौदलात झालेल्या उठावापर्यतच्या कालावधीतील महाराष्ट्रातील अनेक क्रांतिकारकांच्या आठवणी जागविण्यात येणार आहेत. यामध्ये वासुदेव बळवंत फडके, चाफेकर बंधू, बाळ गंगाधर टिळक, वि. दा. सावरकर, बाबाराव सावरकर, क्रांतिगुरु लहूजी साळवे, अनंत लक्ष्मण कान्हेरे, मॅडम भिकाजी कामा, पहिली सशस्त्र क्रांतिकारी संघटना 'अभिनव भारत', पत्री सरकार', गणेश विष्णू पिंगळे, वासुदेव बळवंत गोगटे, शिवराम राजगुरु यांसह इतर अनेक क्रांतिकारकांचा समावेश असेल. शालेय विद्यार्थ्यांनी काढलेल्या अनेक आदिवासी क्रांतिकारकांची छायाचित्रे व माहिती देखील यामध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. दालनाच्या पुढील टप्प्यात आणखी काही क्रांतिकारकांची माहिती दिली जाणार आहे. ब्रिटिश राजवटीविरुद्ध महाराष्ट्रातून - त्यावेळच्या मुंबई राज्यातून - दिल्या गेलेल्या सशस्त्र लढ्याची गाथा या ठिकाणी शिल्पे, दुर्मिळ छायाचित्रे व भित्तिचित्रे यांच्या माध्यमातून दाखविली जाणार आहे. राज्य पुराभिलेख विभाग, एशियाटिक सोसायटी, केसरी पुराभिलेख, व मुंबईतील सावरकर संग्रहालयातून यासाठी माहिती मिळविली आहे. या दालनात छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा देखील देखावा निर्माण करण्यात आला आहे.

**भूमिगत बंकरचा पूर्वेतिहास**

दिनांक १६ ऑगस्ट २०१६ रोजी राजभवनातील हिरवळीखाली भव्य ब्रिटीश कालीन बंकर असल्याचे तत्कालीन राज्यपाल चे. विद्यासागर राव यांना आढळले. त्यानंतर लगेचच त्यांनी बंकरची पाहणी करून त्याचे जतन करण्याचे आदेश दिले होते. पहिल्या महायुद्धापूर्वी बांधण्यात आलेल्या या बंकरची वास्तू अनेक वर्षे बंदिस्त असल्यामुळे दुर्लक्षित होती. सतत झिरपणाऱ्या पाण्यामुळे वास्तू स्थापत्य दृष्टीने असुरक्षित झाली होती. ही ऐतिहासिक वास्तू राजभवनाचा वारसा असल्यामुळे तसेच तिच्या वरील बाजूस राज्यपालांचे निवासस्थान व कार्यालय असलेली जलभूषण' ही वास्तू उभी असल्यामुळे राज्यपालांच्या सुरक्षेशी तडजोड न करता बंकरचे संवर्धन करणे आवश्यक होते. या दृष्टीने भूमिगत बंकरच्या वास्तूचे स्ट्रक्चरल ऑडीट केले गेले व नंतर तिचे बळकटीकरण करण्यात आले. या बंकरमध्ये विविध आकारांचे १३ कक्ष असून बंकरच्या सुरुवातीला २० फूट उंच भव्य प्रवेशद्वार, किल्ल्याप्रमाणे बांधकाम तसेच तोफा आत नेण्यासाठी प्रदीर्घ उतार (Ramp) आहे. बंकरचा शोध लागला त्यावेळी त्यातील कक्षांना शेल स्टोअर', गन शेल', काडतूस भांडार (Cartridge Store), शेल लिफ्ट, मध्यवर्ती तोफखाना कक्ष, कार्यशाळा इत्यादी नावे दिसून आली होती. बंकरमध्ये पाण्याच्या निचऱ्याची तसेच शुध्द हवा व नैसर्गिक प्रकाशाची योग्य व्यवस्था असल्याचे आढळले. बंकरमध्ये जागोजागी दिव्यांसाठी जागा (Lamp Recess) ठेवण्यात आल्या होत्या. बंकरचे संवर्धन करताना तसेच आता त्या ठिकाणी क्रांतिकारकांचे दालन करताना सर्व मूळ वैशिष्ट्ये जतन करण्याची काळजी घेण्यात आली आहे. दिनांक १८ ऑगस्ट २०१९ रोजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते या बंकरमध्ये आभासी वास्तवतादर्शक संग्रहालयाचे उदघाटन करण्यात आले होते. मात्र एकूण १३ कक्ष असलेल्या बंकरमधील अनेक कक्ष रिकामे होते. क्रांती गाथा' दालनासाठी यातील अनेक कक्षांचा तसेच मार्गीकेतील भिंतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**'जलभूषण' निवासस्थान**

जलभूषण या वास्तूला किमान २०० वर्षाचा इतिहास आहे. मुंबईचे गव्हर्नर माउंटस्टूअर्ट एलफिन्स्टन यांनी मलबार हिल येथे सन १८२० - १८२५ या काळात प्रेटी कॉटेज' नावाचा छोटा बंगला बांधला होता. जलभूषण' ही वास्तू याच जागेवर उभी आहे. सन १८८५ साली मलबार हिल येथे गव्हर्नमेंट हाउस' स्थलांतरित झाल्यापासून या वास्तूमध्ये ब्रिटीश गव्हर्नर यांचे व स्वातंत्र्यानंतर मुंबईच्या व राज्यनिर्मितीनंतर महाराष्ट्राच्या राज्यपालांचे निवासस्थान राहिले आहे. अनेकदा बांधली गेलेली व विस्तारित केलेली ही वास्तू निवासासाठी असुरक्षित असल्याचे आढळून आल्यामुळे या ठिकाणी नवी वास्तू बांधण्याचे ठरविण्यात आले. दिनांक १८ ऑगस्ट २०१९ रोजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी नव्या जलभूषण' इमारतीची पायाभरणी देखील केली होती. हे बांधकाम पूर्ण झाले असून नव्या वास्तूचे द्वारपूजन पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. 'नवीन जलभूषण' वास्तूमध्ये जुन्या वास्तूमधील ठळक वारसा वैशिष्ट्ये जतन करण्यात आली आहेत.

## भिवंडीतील पीआर विद्यालयात पुष्पवृष्टी व ढोल वाजवत केले विद्यार्थ्यांचे स्वागत



**भिवंडी/अभिजित हिरे**

कोरोना संकटानंतर मागील दोन वर्षापासून बंद असलेल्या शाळा बुधवारी सुरु झाल्या. भिवंडीतील ब्राह्मणआळी येथील प रा विद्यालयात विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करत व ढोल वाजवत विद्यार्थ्यांचे शाळा व्यवस्थापनाने स्वागत केले.विशेष म्हणजे मागील दोन वर्षापासून आपल्या मित्र मैत्रिणींना शाळेत भेटल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओथंम्बुन वाहतांना दिसला. तर राहनाल जिल्हा परिषदेच्या शाळेत देखील मुख्याध्यापक अजय पाटील यांच्या प्रयत्नाने विद्यार्थ्यांचे मोठ्या उत्साहाने स्वागत करण्यात आले. जिल्हा परिषद शाळा राहनाळ येथे पहिलीच्या मुलांचा स्वागत उत्सव व मुलांना मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश वाटप करण्यात आले. यावेळी राहनाळ गावचे सरपंच राजेंद्र मढवी, गटशिक्षणाधिकारी संजय अस्वले, वरिष्ठ विस्तार अधिकारी प्रकाश मते, ग्रामविकास अधिकारी अनिल पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रमिला कडू, आगरी सेना महिला तालुका प्रमुख मनिषा माळी, पालक वर्ग, मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ भिवंडी संचालित पद्मश्री अण्णासाहेब जाधव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे देखील प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी संस्थाध्यक्ष विजय जाधव, उपाध्यक्षा अरुणा जाधव, माजी मुख्याध्यापक पी. एन. पाटील, धर्मसेवक सोन्या पाटील, माजी सभापती नंदिनी महेंद्र गायकवाड, माजी नगरसेवक सिद्धेश्वर कामूर्ती तसेच विद्यालयाचे माजी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खताचा काळाबाजार करणाऱ्या कृषी सेवा केंद्रावर गुन्हे दाखल

**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यात खरीप हंगामाची सुरुवात होत आहे. विविध वृत्तपत्रातून या या खताचा काळाबाजार होत असलेबाबत तसेच युरिया खताचा तुटवडा असल्याबाबतच्या बातम्या प्रसिद करण्यात आले होत्या. त्यानुसार पालघर जिल्हा प्रशासनामार्फत जिल्हयातील सर्व कृषि सेवा केंद्रची तपासणी करण्यात आली असून दोषी असलेल्या कृषी सेवा केंद्रांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले असून त्याचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तसेच एका कृषि सेवा केंद्रास विक्री बंद आदेश देण्यात आला असून ११ कृषी सेवा केंद्रांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेल्या आहेत. त्यांचे कडून खुलास प्राप्त होताच दोषी कृषी सेवा केंद्रावर कारवाई करण्यात येणार आहे.

सध्या पालघर जिल्हयातील कृषि सेवा केंद्रांमध्ये १०२९ मे. टन एवढा युरिया खताचा साठा विक्रीसाठी उपलब्ध आहे. या उपलब्ध साठयाची विक्री कृषि खात्याच्या अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थितीतच करण्याबाबतच्या सुचना देण्यात आल्या आहेत. या व्यतिरिक्त आवश्यकतेनुसार संरक्षित साठा म्हणून उपलब्ध असलेल्या ७७१ मे. टन साठयातील युरिया विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येईल. त्यामुळे पालघर जिल्हयातील शेतकऱ्यांना वेळेवर युरिया खत उपलब्ध होईल याची दक्षता घेण्यात येत आहे. तसेच खते, बियाणे व किटकनाशके विक्री संदर्भात कोणाची तक्रार असल्यास ९४०३८२१८७० या संपर्क क्रमांकावर तक्रार नोंदवावी असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ यांनी केले आहे.

## घरामध्ये चोरी करणाऱ्या महिलेस अटक; माल हस्तगत

**विरार गुन्हे प्रकटीकरण पथकाची उत्कृष्ट कामगिरी**




**विरार/प्रतिनिधी**

विरार पोलीस ठाणे हद्दीतील गोकुळधाम सोसायटी मध्ये घरातील सोने-चांदीचे दागिने चोरुन नेल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणाची तक्रार पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. गुन्ह्याची तीव्रता समजून गुन्हेगाराला अटक करण्यासाठी विरार गुन्हे प्रकटीकरण पथकाला ही जबाबदारी दिली. पोलिसांनी गुन्ह्याचा तपास करण्यास सुरू केला. गोकुळधाम सोसायटी फुलपाडा रोड विरार पूर्व. या विभागातील पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज चेक केले व आपल्या गुप्त माहिती दारात कामाला लावले परंतु यातून काही निष्पन्न झालेले नाही. शेवटी पोलिसांनी घरातील लोकांची चौकशी करण्यास सुरू केली. घटनास्थळावरून तांत्रिक पुरावे हस्तगत केले. पोलिसांनी घरातील व्यक्तीकडून काही माहिती घेऊन त्यांची कसून चौकशी केली असता घरातीलच महिलेने दागिने चोरी झाल्याचे निष्पन्न झाले. अटक केलेल्या आरोपीकडून एक लाख ९० हजार रुपयांचे दागिने हस्तगत केले आहे. पोलिसाकडे कुठलाही सबळ पुरावा नसतानासुद्धा या गुन्ह्याची उकल करण्यात यशाने ही कामगिरी पोलीस उपायुक्त रामचंद्र देशमुख साहेब पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली विरार पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश वराडे, पोलीस निरीक्षक दीपक राग पुणे प्रगटीकरण पथकातील आपली रक्षक संदेश राणी हवालदार सचिन लोखंडे, संदीप शिरू माळे, हर्षद चव्हाण पाटील, विशाल लोहार, रवी वानखेडे, सुनील पाटील, युवराज वाघमारे, सागर घुंगरकर यांनी मेहनत घेतली.

## राहुल गांधी समर्थानात युवक काँग्रेसचा मशाल मोर्चा




**भिवंडी/अभिजित हिरे**

काँग्रेस खासदार राहुल गांधी यांची सतत चार दिवस नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी ईडी कडून चौकशी सुरू आहे. केंद्र सरकारच्या दबावाला मुळे सुरू असलेल्या या चौकशी विरोधात देशभरात काँग्रेस कार्यकर्ते पदाधिकारी रस्त्यावर उतरून आंदोलन करून निषेध नोंदवित आहेत. भिवंडी शहर युवक काँग्रेस अध्यक्ष राहुल पाटील यांनी राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ मशाल मोर्चा चे आयोजन करून या चौकशी विरोधात घोषणाबाजी करीत आंदोलन केले. नारपोली येथे झालेल्या या आंदोलनात अनेक युवक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## दोघा चोरट्यांना करून ८ मोबाईल फोनसह १ लाख ९३ हजारांचा मुद्देमाल जप्त



**लातूर/करकरे अंबादास**

पोलिस स्टेशन गांधी चौक येथे दाखल झालेल्या जबरी चोरीच्या गुन्हा उघडकीस आणण्याकरिता वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस पथक तयार करण्यात आले. सदर पथक गुन्हा उघडकीस आणण्याचा प्रयत्न करीत असताना दिनांक १७/०६/ २०२२ गुन्हे तपास पथकातील पोलिसांना माहिती मिळाली की, दोन मुले गांधी चौक मार्केट मधील मोबाईल दुरुस्तीच्या दुकानांमध्ये त्यांच्या कडील मोबाईलला सॉफ्टवेअर मारून मोबाईलचा लॉक तोडण्या संबंधी विचारपूस करीत फिरत आहे. अशी माहिती मिळाल्याने सदरच्या माहितीची शहनिशा करून वरिष्ठांच्या मार्गदर्शनात नमूद माहिती मधील ठिकाणी पोलीस पथक पोहोचले. तेथे दोन मुले संशयितरित्या वावरताना आढळून आल्याने त्यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी त्यांचे नाव आजिम कासिम सय्यद (२५) कृष्णा दिगंबर भोसले (२२) असे असल्याचे सांगितले. त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे वेगवेगळ्या कंपनीचे एकूण आठ मोबाईल फोन आढळून आले. सदर मोबाईल फोन बाबत त्याच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी सांगितले की, आम्ही सदरचे मोबाईल लातूर शहरातून वेगवेगळ्या ठिकाणा वरील लोकांना दमदाटी करून मोबाईल हिसकावून घेऊन चोरी केल्याचे सांगितले. त्यावरून नमूद आरोपींना पोलीस ठाणे गांधी चौक येथे दाखल असलेला गुन्हा रजिस्टर क्रमांक २६७/२०२२ कलम ३९२ भादवी मध्ये अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली स्प्लेंडर मोटर सायकल व चोरीचे ०८ मोबाईल असा एकूण एक लाख ९३ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस स्टेशन गांधी चौक पोलीस अमलदार पवार हे करीत आहेत. सदरची कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी, (लातूर शहर) जितेंद्र जगदाळे यांचे मार्गदर्शनात, पोलीस ठाणे गांधी चौक येथील पोलीस निरीक्षक प्रेमकुमार माकुडे यांचे नेतृत्वात पोलीस तपास पथकातील पोलीस अमलदार दामोदर मुळे, युसुफ शेख, रणवीर देशमुख, शिवाजी पाटील, दत्ता शिंदे, रणजित शिंदे तसेच चार्ली पोलीस पेट्रोलिंग क्रमांक ०१ व ०२ चे पोलीस अंमलदार गोविंद मुळे, श्रीमंत आरदवाड, अर्जुन डिगोळे यांनी केली.

20 TO 26 JUNE 2022 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 18/06/2022 10:21 PM Page 1



## पान १ वरून...

### भेळवाल्याच्या पत्नीचा सोनाराला ...

कृषी उत्पन्न बाजार समिती च्या वतीने १९९५ मध्ये कोनगाव येथे ३३ गुंठे खाजगी जागेत बकरा बाजार सुरू केले. या ठिकाणी मागील कित्येक वर्षे परराज्यातून व्यापारी बकरे विक्री साठी येतात तर खरेदी साठी ठाणे जिल्ह्यासह मुंबई रायगड पुणे येथून व्यापारी येत असतात परंतु या ठिकाणी बाजाराचे नियोजन करणाऱ्या समिती कडून कोणत्याही सुविधा पुरविल्या जात नाहीत नव्हेच तर शौचालय पीण्याचे पाणी याची सुध्दा वानवा असते. या बाबत ओरड होत असतानाच खरेदीदार व्यापारी यांच्या कडून अव्वाच्या सव्वा पैसे वसूल करून शासना कडे अत्यल्प महसूल जमा केला जात असल्या बाबत तक्रारी शासन स्तरावर केल्या गेल्याने या बाबत विचार करण्या साठी कृषी उत्पन्न बाजार समिती चे सभापती देविदास पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेस समिती सदस्य दयानंद पाटील, विशुभाऊ म्हात्रे, विलास पाटील, अनंत पाटील, सचिव यशवंत म्हात्रे यांसह मोठ्या संख्येने व्यापारी उपस्थित होते. सभेच्या सुरवातीला सचिव यशवंत म्हात्रे यांनी सभा अयोजना मागील हेरू स्पष्ट करताना बाजार समिती कायद्या नुसार बाजारात येणारे व्यापारी, खरेदीदार यांना चांगल्या सुविधा मिळाव्यात, परराज्यातून येणारे व्यापारी यांना निवास व्यवस्था, बकरे शेड या उभारणीसाठी मोठया जागेची आवश्यकता असून त्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती बाजार स्थलांतरीत करण्याचा विचार करीत असल्याचे स्पष्ट केले. तर सभापती देविदास पाटील यांनी व्यापारी व खरेदीदार यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी समिती वचनबद्ध असल्याचे स्पष्ट करीत बाजारा साठी दुगाड येथे मोठी जागा उपलब्ध असल्याने त्या बाबत सर्वांनी सहकार्य केल्यास सहज शक्य होईल असे स्पष्ट केले. कोनगाव येथील बकरा बाजारात जाण्यासाठी अरुंद रस्ता, वाहने उभी करण्यासाठी जागा नसल्याने बकरे व्यापारी त्रस्त असून स्थानिक गावगुंडांचा त्रास व्यापारी वर्गाला सहन करावा लागतो. तर अडते म्हणून काम करणारे दलाल हे बंदी असलेल्या रुमाला खाली बोटे पकडून खरेदी विक्री व्यवहार करीत असून त्यामुळे व्यापारी वर्गाची पिळवणूक होत असल्याचे सांगत ठाणे येथील व्यापारी इरफान जानवेकर यांनी समिती कडून वसूल केली जाणारी फी ही कमी वसूल करून शासनाचे उत्पन्न बुडविले जात असून त्या मध्ये भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप केला आहे.

# आत्मा मालिक शाळेत विद्यार्थ्यांचे अनोखे स्वागत

**वाडा/प्रतिनिधी**



वाडा तालुक्यातील अंभई येथील आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुला मध्ये शाळेच्या पहिल्या दिवसाचे अतिशय सुंदर आगळ्या वेगळ्या पद्धतीने विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. सोमवारी (दि.१३जून) विद्यार्थ्यांनी गुरुदेवांच्या दर्शनाने शाळेच्या प्रांगणात प्रवेश केला. शाळेच्या प्राचार्या व सर्व शिक्षक यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांना आरती करुन त्यांना तिलक लावून शाळेचे मौल्यवान रत्न म्हणुन त्यांच्या कडून रिबन कापली. त्यांना सुंदर असे गिफ्ट दिले आणि लेझिम नृत्याच्या जल्लोषाने त्यांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांनी शाळेत येण्याची लागलेली ओढ व आपल्या शाळेप्रती असणारे प्रेम आपल्या शब्दात व्यक्त केले. सदर कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष विलास आकरे- पाटील, जेष्ठ गुरुबंधू काशिनाथ पाटील, कार्याध्यक्ष अभिजीत पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सदर कार्यक्रमामध्ये संकुलातील सर्व विभागामध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचारी वर्गाने अतिशय मेहनत घेतली. सदर कार्यक्रम अतिशय सुंदर अश्या नियोजनाने शिक्षक व विद्यार्थी यांच्या चेहऱ्यावरील आनंद द्विगुणित करणारा होता. संकुलातील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षाच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी शालेय अभ्यासक्रम व विविध उपक्रामध्ये आपला सहभाग घेऊन आपले कौशल्य दाखविले पाहिजे असे विद्यार्थ्यांना पटवून दिले तसेच विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित करत विद्यार्थ्यांचा शालेय पहिल्या दिवसाचा स्वागताचा कार्यक्रम साजरा केला आहे. याप्रसंगी शाळा व्यवस्थापक राजेश पाटील, स्कुल प्राचार्य कॅर्मिलीन डिसूजा, कॉलेज प्राचार्य सचिन मोकशी, मराठी माध्यम समन्वयक दीप्ती आकरे, मराठी माध्यम मुख्याध्यापक बाळाभाऊ गायकवाड, एच. आर. प्रमुख चैताली पाटील, कॅम्पस समन्वयक गिरीश बिजुटकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# भिवंडीत सडक्या फळांचा ज्युस काढणाऱ्या विक्रेत्याचा व्हिडीओ व्हायरल

**भिवंडी/प्रतिनिधी**

रस्त्याच्या कडेला असलेल्या दुकानात फळांचा ज्यूस विकणाऱ्या विक्रेता सडलेल्या फळांपासून ज्युस तयार करीत असल्याचा खळबळजनक व्हिडिओ सोशल मीडियावर भलताच व्हायरल झाला आहे. हा व्हिडीओ कल्याण-भिवंडी मार्गावरील साईबाबा मंदिराच्या शेजारी असलेल्या ज्युस सेंटरचा असल्याचे समोर आले आहे. भिवंडीत राहणारे काही दक्ष तरुण त्या ज्युस सेंटर गेले होते. त्यावेळी त्या तरुणाचे ज्युस सेंटर वरील ठेवलेल्या विविध फळांकडे लक्ष गेले असता त्यामध्ये काही सडके फळही असल्याने त्या तरुणांनी त्या सडलेल्या फळांचा व्हिडिओ आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात कैद करून तो व्हायरल केल्याने हि घटना समोर आली आहे. या व्हिडिओ मध्ये ज्युस विक्रेता हातात सडलेले अननस दिसत आहे. सदरील ज्यूस सेंटर चालक या अननसाचं ज्यूस बनवत होता. असा दावा व्हिडिओ चित्रीकरण करणाऱ्या तरुणाने केला आहे. शरीराला चांगला थंडावा मिळावा म्हणून आपण ज्यूस पिण्यासाठी जातो. मात्र ज्यूस सेंटर चालक कशा पद्धतीने सडक्या फळांचा वापर करून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण करत आहेत. हे व्हायरल व्हिडिओतून दिसून येते. विशेष म्हणजे जेव्हा हा तरुण व्हिडिओ तयार करीत होता. तेव्हा ज्यूस सेंटरच्या कामगाराने हे अननस फेकून दिले आहेत. दुसरीकडे हा व्हिडिओ समोर येताच परिसरातील नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. त्यानंतर काही वेळाने ज्युस सेंटरवर गोधंळ उडाला असता आणखी काही तरुण या ठिकाणी आले आणि त्यांनी ज्यूस सेंटर चालकाला सेंटर बंद करण्यास भाग पाडले. शिवाय त्याच्या डोक्यावर सडक्या फळांचा ज्युस ओतल्याचे व्हिडिओ मध्ये दिसत आहे.

# दलित वस्तीच्या निधीचा गैरवापर करणाऱ्या नगर पंचायत अधिकाऱ्यावर कारवाईची रिपब्लिकन सेनेची मागणी

**देवणी/प्रतिनिधी**



बस स्थानक ते महाराष्ट्र ग्रामीण बँक या मुख्य रस्त्यावर एकही दलितांचे घर नसताना दलित वस्ती सुधार योजनेचा कोट्यावधी रुपयेच्या निधीचा गैरवापर करून हा निधी सवर्ण वस्तीत वापरला जात असून या जातीयवादी नगर पंचायतीने दलित वस्तीला विकासापासून वंचित ठेवत आहे, अशा भ्रष्ट अधिकारी यांची उच्च स्तरीय चौकशी करून संबंधीवर कार्यवाही करण्याची मागणी रिपब्लिकन सेनेचे जिल्हा अध्यक्ष प्रा.नरशिंग सूर्यवंशी आनंदवाडीकर यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

सविस्तर वृत्त असे की मागील पंचवार्षिक काळात दलित वस्ती सुधार योजनेच्या नावाखाली कोट्यावधी रुपयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलं आणि त्या अंदाजपत्रका प्रमाणे निधी मंजूरही झाला. परंतु नगर पंचायतीचा कार्यकाळ संपल्यामुळे मागील लोकप्रतिनिधी व प्रशासनाला या निधीचे कामे करता आले नाहीत व नगर पंचायतीत सत्तांतर झाले. काँग्रेस पक्षाची सत्ता येताच दलित वस्ती सुधार योजनेच्या खात्यावरील निधी दलित वस्तीचा असल्याचे काहीच विचार न करता, ज्या वस्तीत दलित समाजाचे ५०% लोक वास्तव्य करीत असल्यास तो निधी तिथे वापरता येतो असे शासनाचे मार्गदर्शक तत्व असताना या शासनाच्या परिपत्रकाला धाब्यावर ठेऊन सत्तेचा गैरवापर करून हा निधी बस स्थानक ते महाराष्ट्र ग्रामीण बँकेपर्यत सर्रासपणे सवर्ण वस्तीत वापरून दलित वस्तीला विकासापासून वंचित ठेवण्याचे षडयंत्र नगर विकास प्रशासन करीत आहे. ही बाब राजकीय व दलित संघटनाच्या लक्षात येताच रिब्लिकन सेनेसह आठ ते दहा संघटनाने आक्षेप नोंदविला. काँग्रेस पक्ष सत्तेच्या बळावर नगररचनाकार यांच्या सर्वेचा संदर्भ देत जिल्हाधिकरी यांची दिशाभूल करून सवर्ण वस्तीत दलीत वसत्यांचा फलक दाखवून दलित समाजाची फसवणूक केली जात आहे. हा निधी शंभर टक्के दलित वस्तीचा आहे. आर्थिक वर्ष संपत असल्याने हा निधी शासनाला परत जाऊ नये म्हणून हा निधी येथे वापरात असल्याचे लोकप्रतिनिधी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सांगत आहेत. निधिचा गैरवापर झाला हे शंभर टक्के सत्य असून सुद्धा प्रशासची या संदर्भात कोणतीच कारवाई होत नाही. त्यांचे कारण नगर पंचायत प्रशासन भ्रष्ट असल्याचे दिसून येत आहे. या भ्रष्ट कर्मचारी अधिकारी यांच्यावर जोपर्यत कारवाई होणार नाही, तोपर्यंत रिपब्लिकन सेनेचे आंदोलन केले जाईल असा इशारा प्रा नरसिंग सूर्यवंशी यांनी दिला आहे. या निवेदनावर राजकुमार सस्तापुरे, दिलीप सोमाजी शिंदे, अनिल सुर्यवंशी, वैभव म्हेत्रे, सचिन शिंदेसह इतरांच्या स्वाक्षरी आहेत.

# वाड्यात नागरिकांना फळझाडे वाटप



**वाडा/प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे व जेष्ठ नेते बाळा नांदगावकर यांच्या वाढदिवसानिमित्त वाड्यातील खंडेश्वरी नाका येथे मोफत फळझाडे वाटप करण्यात आली. महाराष्ट्र नवनिर्माण सेना वाडा तालुक्याच्या वतीने सलग ७ वर्ष फळझाडे वाटपाचा कार्यक्रम मोठ्या दिमाखात साजरा केला जात असल्याची माहिती तालुका अध्यक्ष कांतिकुमार ठाकरे यांनी दिली. खंडेश्वरी नाका येथे मोठ्या संख्येने फळझाडे घेण्यासाठी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक ह्यांनी गर्दी केली होती. फळझाडांमध्ये जांभूळ, फणस, लिंबू, आंबा, चुकू, पेरू इत्यादी फळझाडांचां समावेश होता. सदर कार्यक्रमाला तालुका अध्यक्ष कांतीकुमार ठाकरे, सचिव जितेश किनी, विद्यार्थी सेना तालुका अध्यक्ष निखिल बागुल, उपतालुका अध्यक्ष विश्वास पाटील, नितीन भोईर, संदीप महाकाळ, रवी जाधव, सहसचिव सतीश पाटील, सूरज भोईर, मनोज चौधरी, विभाग अध्यक्ष राहुल ठाकरे, विकी काळे, भूपेश सावंत, महेंद्र बसवत, महेश भगत, मंगेश चौधरी, वाडा शहर अध्यक्ष मधुर म्हात्रे, विजय बोरसे, रतिष पाटील, दीपक ठाकरे, प्रशांत पाटील, मनसे रोजगार तालुका अध्यक्ष सुरेश भोईर, महिला सेना तालुका अध्यक्ष उषा मोरे, मंगल निकम, मनसे विद्यार्थी सेना उपतालुका अध्यक्ष दिवेश दिनकर, शहर अध्यक्ष हेमंत जाधव, ओमकार साळुंखे, मनोज पाटील, गौरव अंबवणे, करणं यादव आणि महाराष्ट्र सैनिक उपस्थिती होते.

# वाड्यातील लिटिल एंजल्स स्कुलचा शंभर टक्के निकाल

**वाडा/प्रतिनिधी**







वाडा तालुक्यातील नामांकित इंग्रजी माध्यमाची लिटिल एंजल्स इंग्लिश मिडियम स्कूल, यांनी आपली इयत्ता १०वी च्या शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. गेल्या १५ वर्षापासून नियमित शंभर टक्के निकाल देण्यासाठी ही शाळा कटिबद्ध असते.

या यशाच्या परंपरेबरोबरच विद्यार्थ्यांसाठी नियमित मार्गदर्शन वर्ग तसेच विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास व्हावा याच अनुषंगाने शाळा नेहमी प्रयत्नशील आहे. गेली १५ वर्षापासून सतत इयत्ता दहावीच्या निकालाची यशस्वी परंपरा कायम ठेवण्यात श्री साई जनकल्याण संस्था व स्कूल चे चेअरमन चेअरमन देवेंद्र रघुनाथ भानुशाली यांचे मार्गदर्शन लाभत असते. ग्रामीण भागातील एक शाळा १००% निकाल देते ही अत्यंत उल्लेखनीय बाब म्हणता येईल. निर्मिती अनिल ठाकरे हिने ९२.४० टक्के गुण मिळवून शाळेत पहिली व हर्ष सचिन ठाकरे याने ९२.०० टक्के गुण मिळवून दुसरा आला आहे तर चिरायु प्रल्हाद दुरगुडे याने ९१.८० टक्के गुण मिळवत तिसरा क्रमांक आला आहे.

# चेअरमनपदी आप्पासाहेब पाटील

लातूर : रेणापूर तालुक्याती बिटरगाव येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीची २०२२ ते २७ या कालावधीसाठीची पंचवार्षीक निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी आग्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली असून या विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमनपदी आप्पासाहेब नारायणराव पाटील यांची तर अमर भारत वाकडे यांची वर्णी लागलेली आहे. तर संचालकामध्ये उमाकांत रामराव जाधव, शिवराज व्यंकटराव वाकडे, धनंजय दशरथराव चव्हाण, अनंत साहेबराव चव्हाण, विष्णू भागवत जाधव, सूरेखा पुंडलिक साखरे, महादेवी नानासाहेब गाढे, विठ्ठल महादेव बोबडे, व्यंकट किसनराव आलापूरे, बळीराम श्रावण सरवदे, शेख अब्दूल अजिज पापामियाँ यांचा समावेश आहे.

# हातभट्टी निर्मिती व फ्रूट बियरवर राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

**सोलापूर/प्रतिनिधी**



अवैद्य हातभट्टी निर्मिती व फ्रूट बियर वाहतुकीवर कारवाई करून सोलापूर राज्य उत्पादन शुल्क विभागाने ५.५६ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. ही कारवाई बुधवारी बक्षीहिप्परगा सेवा तांडा व विनायक नगर परिसरात करण्यात आलेली आहे. सोलापूर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने दक्षिण सोलापूर तालुक्यातील बक्षीहिप्परगा सेवा तांडा येथील अवैध हातभट्टी दारू निर्मिती केंद्रावर पहाटेच्या सुमारास छापा टाकून पाच दारू अड्डे उध्वस्त केले. या कारवाईत ३ लाख ४५ हजार ९०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. फरार आरोपीविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. तसेच शहरातील विनायकनगर परिसरात अवैध फ्रुट बियरची वाहतूक करून त्यातील २३४ लिटर फ्रूट बियर जप्त करण्यात आले. या कारवाई दरम्यान तरबेज अब्दुल रहीम सगरी व मोहसीन सादिक सगरी (दोघे, रा. सरवदेनगर, मुळेगाव रोड, सोलापूर) यांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत २ लाख १० हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. ही सदरची कारवाई सोलापूर राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक एस एस फडतरे, एस.एम. मस्के, एस.एच.कदम, दुय्यम निरीक्षक यु ही मिसाळ, एस.डी.झगडे, एस.एल. पाटील, पी.बी. देशमुख, जी.आर.होळकर यांच्या पथकाने केलेली आहे.

# बँक सेवेत झालेला बदल तसेच देशाच्या विकास कामात बँकांचा मोठा सहभाग!

**भाग २**

मित्रहो मागिल आठवड्यात आपण बँकांची स्थापना का आणि कशासाठी झाली हे पाहिले. त्यानंतर बँकनी हळूहळू या देशातील गरीबी आणि श्रीमंती यातील अंतर कमी करण्यासाठी कसे कार्य केले हे देखील पाहिले. यामुळे देशातील सर्व धर्म समभाव, बँक सेवेचा देशात सर्वत्र विस्तार, सर्वांनाच शिक्षणाचा हक्क व साह्य, एकत्र येऊन सेवा कार्य करणे यातून जातीय अस्पृश्यता निवारण कार्य, जय जवान जय किसान यांना बँकाचे अर्थ साह्य, सामान्य बँकिग ते संगणकीय बँक सेवा असा ही बदल आपण पाहिला आहे आता आपण बँकांची सेवा प्रणाली याकडे वळणार आहोत.

देशाच्या माजी पंतप्रधान स्वर्गीय श्रीमती इंदिरा गांधी यांनी आपल्या पंतप्रधान पदाच्या कार्यकाळात बँकिग क्षेत्रात आमूलाग्र बदल आणले. यातील मुख्य भाग म्हणजे प्रमुख बँकांचे राष्ट्रीयकृत बँकेत रुपांतर केले. अशामुळे देशातील प्रत्येक माणूस हा बँकिग व्यवस्थेशी जोडला गेला. आपले बचत खाते काढून दरमहा काही रक्कम जमा करु लागला. पुढे आपल्या कुटुंबाच्या भविष्यासाठी सामान्य माणसे नोकरी, धंदा करुन मासिक बचत खाते, बचत मुदत ठेव खाते, भविष्य निर्वाह निधी काढू लागला. त्याला मासिक काटकसर करून पैसे बचत करण्याची हळूहळू सवय झाली. यामुळे या बचत धारकांची आर्थिक स्थिती ही चांगली झाली हे यश बँक सेवकांना दिले पाहिजे. कारण बँक सेवा निस्वार्थ भावनेनी करून आपल्या बँकांबद्दलचा विश्वास वाढवणे, योग्य ती मदत करणे, बैकींग योजनेचा प्रचार व प्रसार करणे, सामान्य लोकांना सहभागी करून घेणे. आपल्या ठरलेल्या वेळेत पेक्षा जास्त वेळ बँकेत बसुन सेवा देणे हे आजही बँक कर्मचारी करीत आहेत. गत एक वर्ष कोरोनामुळे सर्व जग थांबले, पण आपल्या जिवाची पर्वा न करता हे बँक कर्मचारी बँकेत येऊन काम करीत होते. हे जर सुट्टीवर गेले तर काय होईल याचा आपण विचार देखील करु शकत नाही.

असो या पुढे याच सरकारी बँकांनी देशातील प्रत्येक क्षेत्राच्या विकास कामात आर्थिक साह्य केले. राज्य शासन अथवा केंद्र शासन असो विकास कामात आणि औद्योगिक वस्ती स्थापन करण्यात यांचा सिंहाचा वाटा आहे. आपल्या देशाने देखील केवळ जागतिक बँके कडुन विकास कार्यासाठी कर्ज घेण्याऐवजी आपल्याच देशातील या बँकाचे अर्थ साह्य घेणे पसंत केले.

आता सर्व बँका आपला लेखापरीक्षण आणि ताळेबंद अहवाल हा ३१ मार्चला जाहीर करते. बँकांचा नफा-तोटा हा त्यांच्या वर्षभरातील उलाढाली वर अवलंबून असतो. यासाठी पुढील वर्षात नवनवीन योजना आणून त्या तितक्याच ताकदीने राबविणे, ग्राहकांना संतुष्ट करणं आणि बँक नफ्यात वाढ करते. देशात बँक रेट हा रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार एकच राहतो. यावरुन सर्व बँका आपल्या बँक ठेवी आणि कर्जावरील व्याज दराचे मुल्यांकन ठरवीत असतात. बँकांचा व्यवहार हा चोख आणि पारदर्शी रहावा म्हणून दर चार- सहा महिन्यांनी आणि वर्षाला तिनं ऑडिट होत असते. यामुळे बँकिग कामकाजात घोटाळे होत नाहीत आणि कर्ज धारकांची थकबाकी हि नियंत्रणात राहते. आज पर्यंतचे असे आढळून आले आहे की जिथे घोटाळे होतात तेथे कर्ज मंजूर करताना हलगर्जीपणा अथवा नियम बाह्य कर्ज मंजुरी झाली आहे. तेच कर्ज बुडीत आहेत किंवा थकले गेले आहेत अन्यथा शक्यच नाही. असो हा विषय मोठा आहे. यावर एक सत्र पुर्ण घ्यावे लागेल. आता आपण बँकाची रचना आणि नियंत्रण कार्य पाहणार आहोत. बँकांची तीन प्रकारे वर्गवारी रचना केली जाते त्यात प्रामुख्याने गावाकडच्या 'ग्रामीण बँका' मोठ्या शहरातील शहरी विकास बँका आणि औद्योगिक वित्त बँका होय. आता यांनाही कर्ज मंजुरी साठीची मर्यादा घालून दिलेली असते. त्यामुळे त्यांना हि अर्ज मंजुरीसाठी आपल्या क्षेत्रीय कार्यालयाशी संपर्क साधावा लागतो मंजुरी घ्यावी लागते. सर्व बँकांचे जिल्हा मुख्य कार्यालय, सर्कल कार्यालय, केंद्रीय मुख्य कार्यालय असते हि कार्यालये आपल्या शाखांना नियंत्रणात ठेवतात.

रिझर्व बँकेच्या निर्देशानुसार आपली बँक कामकाज करणे की नाही हे पाहते. मोठ मोठाली औद्योगिक कर्ज मंजुरीसाठी यांची तपासणी हि कार्यालये करतात. आता आपल्या देशातील बँका यांचा विस्तार फार मोठा झाला आहे तो देशातील बँका व फायनान्स कंपनी यातील सेवा देणारे कर्मचारी यांच्या मुळेच. हे सेवक १५ ते २० लाखा संखे पेक्षा अधिक आहेत. यांच्या जगभरात अनेक शाखा आहेत यातुनच आंतरराष्ट्रीय चलन यांची देवाण-घेवाण होत असते. आतर राष्ट्रीय बाजारात मुख्यतः डॉलरने व्यवहार चालतो. याचे दर हे वर-खाली ही होत असतात. करोना काळातील महामारीमुळे जगभरात आर्थिक मंदी आली. अशा वेळी बँकानी सामान्य ग्राहकांना तसेच लहान व्यवसाय करणाऱ्यांना मोठ दिलासा दिला. आपल्या देशात अस्थिरता वाढू दिली नाही हे कौतुकास्पद होय. ग्रामीण या भागातील बँकानी शेतकरी, बागायतदार यांना मुबलक कर्ज देणे, लघु उद्योग, कुकुट पालन, वेळी मेंढी अथवा दुध देणारी जनावरे यासाठी कर्ज देणे.जमीन खरदी- विक्री, विहीर, पाटबंधारे इत्यादीसाठी कर्ज देणे बंधनकारक आहे असे शासनाने बँकासाठी जाहीर केले. याचा लाभ करोडो शेतकरी घेत आहेत. याचा अधिक गतीने बदल होत आहे, शेतकरी सक्षम व्हावा हा यामागील मुळ हेतु होय. **(क्रमशः)**



**- नंदकिशोर नरसिंह पवार, वसई रोड**

20 TO 26 JUNE 2022 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 18/06/2022 10:22 PM Page 1



# मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये महाराष्ट्र सुरक्षा बलाचे २५० जवान कर्तव्यासाठी दाखल



**वसई/प्रतिनिधी**

मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये पोलीस मनुष्यबळ अपुरा असल्यामुळे विविध पोलिस ठाणे हद्दीत बंदोबस्तासाठी पोलिसांवर अतिरिक्त ताण पडत असतो. या कामकाजाकरीता मदत मिळावी म्हणून आयुक्तांनी महाराष्ट्र सुरक्षा बलाचे पाचशे जवान मिळावे यासाठी शासनाकडे मागणी केली होती. शासनाने या मागणीला मंजुरी देऊन पहिल्या टप्प्यात महाराष्ट्र सुरक्षा बलाचे २५० जवान मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील पोलिसांच्या मदतीला दाखल झाले आहेत. मीरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयातील वाढती लोकसंख्या पाहता पोलीस प्रशासनावर कामाचा ताण पडत आहे. तसेच लोकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांकडून योग्य ती मदत मिळत नव्हती. मीरा-भाईंदर वसई-विरार या ठिकाणी पोलीस बंदोबस्त नाका-बंदी, कोम्बिंग ऑपरेशन, सागरी कवच, वाहतूक नियंत्रण या विविध कामामध्ये पोलिसांना मदत करण्यासाठी महाराष्ट्र सुरक्षा बलाचे २५० कर्मचारी मीरा- भाईंदर पोलीस आयुक्तालयातील विविध पोलीस ठाण्यात पाठवण्यात आले आहे. जेणेकरून पोलिसांना मदत करू शकते. आयुक्तालयाकडून पाचशे जवानाची मागणी करण्यात आली होती. परंतु शासनाने प्रथम टप्प्यात दोनशे पन्नास जवान कर्तव्यासाठी दिले आहेत. तसेच ५०हून अधिक महिला सुरक्षा रक्षक हजर होणार आहेत. आयुक्तालयातील पोलीस ठाणे व इतर शाखेतील मनुष्यबळ आवश्यकता लक्षात घेऊन त्या त्या ठिकाणी हे जवान कर्तव्यासाठी हजर केले जातील. या जवानांना मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्र कामकाज व त्यांना देण्यात येणाऱ्या कर्तव्या बाबत माहिती देण्यात आली आहे. पोलीस आयुक्तालयामध्ये नव्याने कर्तव्यासाठी हजर झालेले महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांना पोलीस आयुक्त सदानंद दाते यांनी मार्गदर्शन केले. पोलीस सोबत कर्तव्य करत करताना त्यांना सामान्य नागरिकाच्या अपेक्षित कामांना प्राधान्य देऊन व 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीदवाक्य प्रमाणेच कर्तव्यनिष्ठ राहून काम करणे अपेक्षित असल्याबाबत मत पोलीस आयुक्त यांनी व्यक्त केले आहे.

### केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेतील गुणवंताचा दिव्य गौरव सोहळा संपन्न

# स्पर्धा परीक्षेतील यश हे तुमच्या मेहनतीच फळ असतं, बाकी सगळे योगायोग असतात -जिल्हाधिकारी पृथ्वीराज

**लातूर/करकरे अंबादास**

जिल्हा परिषदेच्या शाळेत प्राथमिक शिक्षण घेऊन शुभम भोसले आणि रामेश्वर सब्बनवाड यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेत मिळवलेलं यश हे जिल्ह्यातील शेकडो विद्यार्थ्यांना नवी दिशा देणारे ठरेल. जिल्हा परिषदेची शाळा गुणवत्तेत कुठेही कमी नाही याचही हे उदाहरण आहे. स्पर्धा परीक्षेतील यश हे तुमच्या मेहनतीच फळ असतं. बाहेरून कितीही ज्ञान मिळालं तरी त्याचा काही उपयोग होत नाही जो पर्यत ते आतून येत नाही तो पर्यत तुमच्या स्वप्नातल्या यशाला गाठता येत नाही असं प्रतिपादन जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांनी केले. बुधवारी संध्याकाळी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या २०२१ च्या स्पर्धा परीक्षेतील लातूर जिल्ह्यातील यशस्वी गुणवंताचा गौरव जिल्हा प्रशासनाच्या वतीने आयोजित केला होता, त्यावेळी ते बोलत होते.



जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, अपर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे, गेल्या वर्षी ज्यांनी हे यश संपादन केलं आणि सध्या आय ए एस चे प्रशिक्षण घेत आहेत ते विनायक महामुनी, कमलकिशोर कंडारकर, ज्यांचा माता पित्यासह गौरव झाला ते शुभम भोसले, रामेश्वर सबनवाड यावेळी उपस्थित होते. स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी सगळ्यात महत्वाचे आहे तुमची इच्छा शक्ती, त्यानंतर अभ्यासाला लगणारी पुस्तकं, त्यातली पहिली गोष्ट मनाची इच्छा शक्ती जी सर्वस्वी तुमच्याशी निगडित आहे. दुसरी बाब पुस्तकं आणि अभ्यासिका बाबतीत जिल्हा प्रशासन सकारात्मक आहे. येणाऱ्या काळात स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या क्षेत्रातील मंडळींना बोलावून त्यांचे व्याख्यान चर्चासत्र ठेवण्याचा आमचा प्रयत्न राहिल असे जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले. यावेळी त्यांनी यशस्वी झालेल्या दोघांच्या पालकांचेही मनस्वी अभिनंदन केले.

स्पर्धा परीक्षेतील दोन्ही विद्यार्थ्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेतून झाल्यामुळे आणि मी जिल्हा परिषदेचा ...पान ६ वर

# शिवाजी चौक ते उदयगिरी महाविद्यालयापर्यंतच्या विकासकामांचा संजय बनसोडे यांच्या हस्ते शुभारंभ

**उदगीर/प्रतिनिधी**



जिल्ह्यातील उदगीर तालुक्यातील अहमदपूर-शिरुर ताजबंद-उदगीर राज्य मार्ग क्र. २४९ कि.२३१/६०० ते २३३/00 या कामाचा रस्त्याच्या रुंदीकरणासाठी मजबुतीकरण करणे, रस्त्याच्या मधोमध १.५० रुंदीचे सिमेंट क्रॉंन्क्रीटमध्ये रस्ता दुभाजक बांधणे, रस्त्यांच्या दोन्ही बाजूस सिमेंट क्रॉंन्क्रीटमध्ये १.५० मीटर रुंदीचे नालीचे बांधकाम करणे, दुभाजकाच्या दोन्ही बाजूस ७.00 मीटर रुंदीचा सिमेंट क्रॉंन्क्रीट रस्ता करणे. सिमेंट क्रॉंन्क्रीट रस्त्यापासून दोन्ही बाजूस ४.५० मीटर रुंदीचा डांबरी पृष्ठभागाचा सेवा रस्ता (सर्व्हीस रोड) करणे. इत्यादी बाबीचा समावेश सदरील कामाच्या अंदाजपत्रकात करण्यात ओलेला आहे. सदरील कामाचा काम पूर्ण करण्याचा कालावधी १२ महिने असून दिलेल्या मुदतीत काम पूर्ण होणार आहे, असे राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले. जिल्ह्यातील उदगीर तालुक्यातील अहमदपूर-शिरुर ताजबंद- उदगीर राज्य मार्ग क्र. २४९ कि.२ ३१/६00 ते २३३/00 रस्त्यांची विशेष दुरुस्तीचा शुभारंभ राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले. छत्रपती शिवाजी ...पान ६ वर

# महिलांनो बचतगटांच्या माध्यमातून यशस्वी उद्योजिका बना -प्रवीण दवणे

**लातूर/प्रतिनिधी**

आज महिलांसाठी शासनातर्फे स्वयंरोजगाराच्या अनेक योजना कार्यान्वित आहेत,अशा योजनेचा फायदा ग्रामीण भागातील महिलांनी घेऊन घरबसल्या स्वतःचा छोटा उद्योग सुरू करून महिला बचत गटाच्या माध्यमातून व्यवसाय सुरु करण्याची संधी मिळाली आहे ती सोडू नका.व्यवसायासाठी तांत्रिक व ज्या विविध परवानग्या लागतात त्यांचे मार्गदर्शन घेऊन यशस्वी उद्योजक बना,तुमच्या कामाची दखल घेऊन शासकीय पुरस्कार मिळून तुमचे नावलौकिक होईल अशी मेहनत करा, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार प्रवीण ना.दवणे यांनी केले. तारापोरवाला सागरीजीवशास्त्रीय संशोधन केंद्र, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण क्रुषी विद्यापीठ, दापोली व कृषी विज्ञान केद्र, कोसबाड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित डहाणूतील महिला बचत गटांच्या महिलांसाठी मुल्यवर्धित मत्स्यपदार्थ निर्मिती आणि विक्री या विषयावर १५ ते १७ जून पर्यत तीन दिवसांचे प्रशिक्षणाचे आयोजन कोसबाड कृषी विज्ञान केंद्रात करण्यात आले होते. त्या



प्रशिक्षणाच्या समारोपाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन प्रवीण दवणे यांनी मार्गदर्शन केले. कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.विलास जाधव यांनी ग्रामीण भागातील महिलांसाठी केंद्र विविध प्रशिक्षणाव्दारे महिलांना स्वयंरोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असून अनेक महिला लाभ घेत असल्याची माहिती दिली. बाजारात कमी दरात मिळणाऱ्या माशांपासून कटलेट, लोणची, वडे, चकली, पापड, जवळा चटणी, बोंबील चटणी आदी मुल्यवर्धित मत्स्यपदार्थ बनविण्याचे प्रशिक्षण महिला बचत गटांना देण्यात आले. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापिठाअंतर्गत केंद्रीय मत्स्य संशोधन अधिकारी डॉ.सुधाकर इंदुलकर, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.विलास जाधव, सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ.शार्दुल गांगण, वर्सोवा येथील केंद्रीय मत्स्य संशोधन केंद्रातील प्रमुख विद्यावेत्ता डॉ.अमजद बालंगे, डॉ. साबळे, डॉ. सपकाळ, महाडकर, महाडकर आणि तांबे आदी मान्यवर उपस्थित होते. शेवटी कृषि विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञ रूपाली देशमुख यांनी आभार मानले.






# कोटक महिंद्रा बँकेतर्फे विवेकानंद रुग्णालयास कार्डियाक ॲम्ब्युलन्स भेट



**लातूर/प्रतिनिधी**

कोटक महिंद्रा बँक लिमिटेडच्या सीएसआर फंडातून विवेकानंद रुग्णालयास कार्डियाक ॲम्बुलन्स देण्यात आली असून या रुग्णवाहिकेचा हस्तांतरण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. कोटक महिंद्रा बँकेतर्फे सीएसआर फंडातून सुमारे ३० लक्ष रुपयाची कार्डियाक म्बुलन्स रुग्णालयास प्रदान करण्यात आली आहे.या म्बुलन्समध्ये ऑक्सिजन, व्हेंटीलेटर, डीफेब्रीलेटर आदी अतिदक्षता विभागासारख्या अद्ययावत सुविधा उपलब्ध आहेत. ॲम्बुलन्स प्रदान सोहळ्यास कोटक महिंद्रा बँकेचे कार्यकारी उपाध्यक्ष राजीव ठक्कर, ग्री बिझनेस गृपचे उपाध्यक्ष सुरेश नारापराजु व रणजीत चामले यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी नवीन कार्डियाक ॲम्बुलन्सची पुजा करुन त्यास मान्यवरांच्या हस्ते झेंडा दाखवण्यात आला. कोटक महिंद्रा बँकेने सीएसआर फंडातून यावर्षी तीन म्बुलन्स महाराष्ट्रात दिल्या असल्याचे राजीव ठक्कर यांनी यावेळी बोलताना सांगितले.

आरोग्य क्षेत्राशिवाय अन्य क्षेत्रातही दरवर्षी मदत करीत असल्याचे त्यांनी नमूद केले. विवेकानंद रुग्णालयासारख्या सेवाभावी रुग्णालयास कार्डियाक म्बुलन्स देऊन बँकेने भरीव मदत केली असून ही म्बुलन्स गरजू रुग्णांना सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देण्यात येईल, असे आश्वासन संस्थेचे कार्यवाह व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.राधेशाम कुलकर्णी यांनी दिले. रुग्णालयाच्या आजवरच्या प्रगतीत कोटक महिंद्रा बँकेसारख्या दानशूर संस्थांचा मोलाचा वाटा आसल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद केले.कोटक महिंद्रा बँकेचे आभार मानून भविष्यातही बँकेने विवेकानंद रुग्णालयास सीएसआर फंडातून मदत उपलब्ध ...पान ६ वर

# लातूर विभागीय कार्यालयाची एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

**लातूर/प्रतिनिधी**



प्रशासकीय कामकाजामध्ये लेखा व आस्थापना शाखेचे कामकाज अत्यंत महत्वाचे आहे. ज्याप्रमाणे आपल्या शरिरातील अवयवामध्ये ह्दयाचे महत्व आहे. त्याप्रमाणेच लेखा व आस्थापना हे विषय प्रशासकीय कामातील ह्दयस्थानच आहे. त्यामुळे या शाखेतील काम करणाऱ्यांचे प्रशासनात खूप महत्वाचे स्थान असते, त्यांच्या कामावरच शासनाची प्रतिमा तयार होते, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांनी आज येथे केले. लातूर विभागीय माहिती कार्यालयाच्यावतीने लेखा व आस्थापना विषयक कार्यशाळेचे येथील जिल्हा परिषदेच्या डॉ. शिवाजीराव पाटील-निलंगेकर स्थायी सभागृहात आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते कुंडीतील झाडाला बांधलेल्या फितीची गाठ सोडून व त्या झाडास पाणी देत अभिनव उपक्रमाने झाले. त्यावेळी गोयल बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक (माहिती) यशवंत भंडारे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य वित्त व लेखाधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग) नितीन दाताळ हे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर लातूर जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील, नांदेड जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार, हिंगोली जिल्हा माहिती अधिकारी श्र्वेता पोटुडे उपस्थित होते. त्याचबरोबर सहाय्यक संचालक किरण वाघ, माहिती सहाय्यक रेखा पालवे-गायकवाड, लेखापाल अशोक माळगे तसेच लातूर, नांदेड, उस्मानाबाद, हिंगोली या चारही जिल्ह्यातील अधिकारी, कर्मचारी यांचीही उपस्थिती होती. आस्थापना व लेखा ...पान ६ वर